cmyk

## संपादकीय

### महिला आरक्षण: संख्या पेक्षा सक्षमीकरणाची गरज !

राजकारणात महिलांची वाढती उपस्थिती ही नक्कीच सकारात्मक बदलाची नांदी मानावी लागेल. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाल्यानंतर त्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील अलीकडील नगरपालिका, नगरपंचायत, महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमधील आकडेवारी याची साक्ष देते. हजारोंच्या संख्येने महिला निवडून आल्या आहेत, आणि स्थानिक सत्तेत त्यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. मात्र, या संख्यात्मक वाढीच्या पलीकडे जाऊन गुणात्मक वाढ साध्य करणे ही काळाची खरी गरज आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३२ | सोमवार दि.२० एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### निवडणूक आयोगाचा सोशल मीडियावर 'वॉच'

नवी दिल्ली : देशात सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुका आणि पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या गैरवापराबाबत अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. या काळात सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने व्हावा यासाठी आयोगाने कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून आतापर्यंत ११ हजारांहून अधिक आक्षेपार्ह पोस्टवर कारवाई करण्यात आली आहे. निवडणुकांमध्ये दिशाभूल करणारी माहिती पसरवण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला तक्रार मिळाल्यापासून ३ तासांच्या आत तो मजकूर हटवावा लागेल, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, राजकीय पक्षांनी प्रचारासाठी एआयचा वापरल्यास त्यावर एआय-जनरेटेड किंवा डिजिटल पद्धतीने बदललेले असे लिहिणे निवडणूक आयोगाने बंधनकारक केले आहे.

### वीजनिर्मितीत 'एआय'चा वापर करा – मुख्यमंत्री

मुंबईः राज्यातील वीजनिर्मिती आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ऊर्जा विभाग व संबंधित यंत्रणांनी 'एआय'चा वापर करून व्यवस्थापन करण्यावर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले. फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवारी सह्याद्री अतिथीगृह येथे उन्हाळ्याच्या काळातील 'पीक डिमांड'संदर्भात वीज वितरण आढावा बैठक झाली. यावेळी त्यांनी वीज व्यवस्थापनासाठी तसेच देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांसाठी 'एआय'चा वापर करण्याचे निर्देश दिले. उन्हाळा आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा व संबंधित यंत्रणांनी वीजनिर्मिती आणि वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी सर्व उपाययोजना युद्धपातळीवर कराव्यात, असेही मुख्यमंत्री म्हणाले. रूफटॉप सौरऊर्जेमुळे फायदा होत आहे. वीजनिर्मितीसाठी पुरेशी कोळसा आणि पाण्याची उपलब्धता आहे. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### सुमारे ५० अब्ज डॉलर्सचे तेल गेले वाया

तेहरान : इराणवरील अमेरिका-इस्रायल युद्ध केवळ लष्करी संघर्षापुरते मर्यादित राहिले नाही. त्याचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला आहे. अंदाजे ५० दिवसांत ५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे कच्चे तेल वाया गेले आहे. त्याचा परिणाम येत्या काही महिन्यांपर्यंत आणि वर्षांपर्यंत जाणवेल, असे एका अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. विश्लेषकांच्या मते, फेब्रुवारीच्या अखेरीस संघर्ष सुरू झाल्यापासून अंदाजे ५० कोटी बॅरल कच्चे तेल आणि कंडेन्सेट बाजारात नियोजित ठिकाणी पोहोचू शकलेले नाही. ही सर्वात मोठा ऊर्जा पुरवठ्यातील अडचण आहे. त्यामुळे मागणी-पुरवठा साखळीत व्यत्यय आला आहे. इराणवरील अमेरिका-इस्रायल युद्धाचा परिणाम आता जगाच्या अर्थव्यवस्थांवर स्पष्टपणे दिसत आहे. अंदाजे ५० दिवसांत, ५० अब्ज डॉलर्स किमतीचे कच्चे तेल वाया गेल्याने जागतिक पुरवठा आणि किमतींवर लक्षणीय परिणाम झाला आहे. ५० कोटी बॅरल तेल वाय गेल्याचा मोठा परिणाम जागतिक बाजारावर होऊ शकतो. हे तेल जगभरातील हवाई प्रवासाला अंदाजे १० आठवडे किंवा जगभरातील सर्व प्रकारच्या वाहनांना अंदाजे ११ दिवस इंधन पुरवण्यासाठी पुरेसे आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ एप्रिल २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४२.०० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,२८४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६४.०० क्विंटल | १,७४० | ४,६०१ | २,६८६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२६.०० क्विंटल | २,२०० | २,६४९ | २,३५४ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,२५१ | ५,२५१ | ५,२५१ |

# कर्जमाफीची घोषणा कागदावरच; निकष अस्पष्टतेमुळे शेतकरी संभ्रमात

पुणे । प्रतिनिधी

**राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना'कडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र खरीप हंगाम तोंडावर येऊनही या योजनेची अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नसून निकषही स्पष्ट करण्यात आलेले नाहीत.**



**त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.** फेब्रुवारी-मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात कर्जमाफीची घोषणा होताच राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला होता. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना या योजनेमुळे मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु प्रत्यक्षात खरीप हंगामाची सुरुवात होत असतानाही कोणत्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार, याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. राज्यातील अनेक शेतकरी सध्या मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी आहेत. थकीत कर्जामुळे अनेकांची नावे एनपीए (नॉन-परफॉर्मिंग ॲसेट) यादीत गेली आहेत. परिणामी अशा शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज मिळणे कठीण झाले आहे. यामुळे खरीप हंगामासाठी ▶▶ पान २ वर

> **हजारो शेतकरी संकटात...**
> शासनाने या पार्श्वभूमीवर तातडीने कर्जमाफी योजनेचे स्पष्ट निकष जाहीर करून अंमलबजावणी सुरू करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. अन्यथा हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मनुस्मृती जपणाऱ्या भाजपची आरक्षणाबाबत बनवाबनवी!

## काँग्रेस नेते वडेट्टीवार यांची भाजप अन आरएसएसवर बोचरी टीका; नवनीत राणा जातीय विष पेरणारी विषवल्ली

मुंबई । प्रतिनिधी

महिला आरक्षण बिलावरून देशात रणकंदन सुरू आहे. भाजप आणि काँग्रेसमध्ये शाब्दिक धुमश्चक्री सुरू आहे. विरोधकांच्या एकजुटीने सरकारला मोठा धक्का बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर तिखट हल्ला केल्यानंतर आता काँग्रेसच्या गोटातून तोफ धडाडली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात आणि महायुतीत किती महिला आहेत, असा सवाल विचारून कोंडी केली असतानाच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपला चांगलेच डिवचले आहे. या वादात आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही ओढण्यात आले आहे.

पाच राज्यातील निवडणुका सुरू




असताना आचारसंहितेचे उल्लंघन करण्यात आले आहे. शनिवारी पंतप्रधान यांचे भाषण नव्हते तर राजकीय नेत्यांचे भाषण होते. मोदींना ५० वेळा काँग्रेसचे नाव का घ्यावे लागते, एवढी काँग्रेसची का भीती वाटते आहे.? परकियांना देशावर आक्रमण केले तेव्हा शिवाजी महाराजांचे मावळे तयार झाले. त्यांची परकियांना जशी भीती वाटत होती तशीच भीती काँग्रेसची देशाच्या पंतप्रधानांना वाटत आहे. काँग्रेसने देशाच्या महिलांचा सन्मान केला. पहिल्या महिला पंतप्रधान आणि राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष काँग्रेसने दिले. संघाच्या प्रमुखपदी महिला बसू शकते ▶▶ पान २ वर

> **भाजपवर आलेल्या संकटासाठी देशाला संबोधित करणे चुकीचे – संजय राऊत**
> पंतप्रधान नरेंद्र मोदी काय बोलत आहेत, याकडे देश आता गांभीर्याने पाहत नाही. त्यांना खोटं बोलण्याचा राष्ट्रीय आजार जडलेला आहे. भाजपवर आलेल्या संकटावर देशाला संबोधित करणे चुकीचे आहे, अशा बोचऱ्या शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी (दि. १९) पंतप्रधान नरेंद्र मोदींवर कडाडून टीका केली. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी महिला आरक्षण, पुलवामा आणि महाराष्ट्रातील राजकीय स्थितीवरून भाजपला धारेवर धरले. संजय राऊत म्हणाले की, विधानसभा निवडणुका सुरू असताना महिला आरक्षणावर भाष्य करणे हा थेट आचारसंहितेचा भंग आहे. नरेंद्र मोदींनी आपल्या विधानांसाठी संपूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी करत काँग्रेसशिवाय देशाचे नेतृत्व कोणीही करू शकत नाही, हे मोदी आपल्या वागण्यातून वारंवार सिद्ध करत आहेत,'' असा टोलाही त्यांनी लगावला.

# अशोक खरातच्या पोलीस कोठडीत मोठी वाढ

नाशिक । प्रतिनिधी

**लैंगिक अत्याचार आणि शोषणाच्या पाचव्या प्रकरणात भोंदू बाबा अशोक खरातला नाशिक येथील एका सुट्टीकालीन न्यायालयाने २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. खरातला शनिवारी पाचव्या प्रकरणात औपचारिकरित्या अटक करण्यात आली.**



या प्रकरणात त्याच्यावर काळ्या जादूचा वापर करून आणि स्वतःला ईश्वराचा अवतार भासवून पीडित महिलेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. रविवारी पोलिसांनी त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केले आणि पाच दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. खरातच्या वतीने बाजू मांडणारे वकील सचिन थोरे यांनी युक्तिवाद केला की, सर्व प्रकरणांचे स्वरूप सारखेच आहे आणि याच कारणास्तव पोलिसांना यापूर्वीच पुरेशी कोठडी देण्यात आली आहे. त्यामुळे पुढील कोठडीची आवश्यकता नाही. यावर सरकारी वकील शैलेंद्र बागडे आणि किरण बेंडभर यांनी युक्तीवाद केला की, प्रत्येक पीडित महिलेची कहाणी वेगळी आहे. हे गुन्हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे ▶▶ पान २ वर


# भोंदू राजेंद्र गडगे याचा दत्तधाम दरबार सील

## मंत्रोच्चाराने दुर्धर आजार बरे करण्याचा दावा पोलिसांकडून स्पॉट पंचनामा, अनेक औषधे ताब्यात

अहिल्यानगर । प्रतिनिधी

**संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित 'दत्तधाम दरबार' चालवणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्याविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गडगेच्या दरबारावर पोलिसांनी छापा टाकत संपूर्ण परिसर सिल केला असून तब्बल चार तास झाडाझडती घेण्यात आली. या कारवाई दरम्यान दरबारात स्पॉट पंचनामा करण्यात आला. तसेच विविध औषधांचे नमुनेही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

नागरिकांची फसवणूक आणि अंधश्रद्धा पसरवल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या राजेंद्र गडगेला



न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून गडगेच्या कथित दरबारामागील संपूर्ण जाळं उघड करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंधश्रद्धेच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अहिल्यानगरमधील संगमनेरच्या भोंदू बाबाचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. पोटाचा आजार दूर करण्याच्या आणि लग्न जमवून देण्याच्या नावाखाली या भोंदूनं बीडमधील तरुणाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी भोंदूनं तब्बल २२ हजार रुपये उकळल्याची माहिती तरुणाने दिली. याबाबत तरुणाने भोंदू बाबाबाबत माजलगाव ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणाचा तपास आता सीआयडीकडे

पुणे । प्रतिनिधी

**राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणाऱ्या अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी हे प्रकरण आता गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपवण्यात आले आहे.**

कर्नाटकात दाखल झालेला हा गुन्हा झिरो एफआयआरद्वारे महाराष्ट्रात वर्ग करण्यात आला असून, बारामती पोलिसांनंतर आता राज्य सीआयडी या



प्रकरणाचा तपास करणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, आमदार रोहित पवार यांनी या अपघाताबाबत संशय व्यक्त करत सखोल तपासाची मागणी केली होती. त्यांच्या आग्रहानंतर कर्नाटक पोलिसांनी झिरो एफआयआर नोंदवला होता. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा गुन्हा महाराष्ट्र पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. पोलीस महासंचालकांच्या आदेशानुसार, पाच दिवसांपूर्वीच हा तपास बारामती ▶▶ पान २ वर

# बीडच्या विद्यार्थ्याची पुण्यात आत्महत्या; तिघांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील हांडेवाडी परिसरात असलेल्या यशोतेज ॲकॅडमीच्या निवासी खोलीत मूळचा बीड येथील रहिवासी असलेला १६ वर्षीय विद्यार्थी अवधूत उल्हास बडे याने १० नोव्हेंबर २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती, मात्र पोलीस तपासात ही आत्महत्या नैराश्यातून आणि संस्थेच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. अखेर पाच महिन्यांनंतर फुरसुंगी पोलिसांनी ॲकॅडमीचे संस्थापक, ▶▶ पान २ वर

# फटाक्यांच्या फॅक्टरीत अग्नितांडव १६ कामगारांचा मृत्यू

चेन्नई । प्रतिनिधी

तामिळनाडूच्या विरुधुनगर जिल्ह्यात रविवारी एका फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत २० कामगारांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपाचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर इतर अनेकजण ढिगाऱ्याखाली दबले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, हा भीषण स्फोट कट्टनारपट्टी परिसरातील एका क्रॅकर युनिटमध्ये झाला. त्यानंतर आजूबाजूच्या चार युनिट्सना आग लागली. या घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. प्रशासनाकडून तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. हा स्फोट इतका भीषण होता की आजूबाजूच्या इमारतींनाही नुकसान झाले. या स्फोटाची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल, पोलीस आणि बचाव पथके दाखल झालू असून ढिगारा हटवून अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम करत आहेत. प्रशासनाने संपूर्ण परिसराला घेराव घालत ▶▶ पान २ वर

# नाशिक, अमरावतीनंतर यवतमाळमध्येही लव्ह जिहाद?

## यवतमाळमधून ३४ अल्पवयीन मुली बेपत्ता

यवतमाळ । प्रतिनिधी

**नाशिकमध्ये कॉर्पोरेट जिहाद, अमरावतीत अल्पवयीन मुलींचं लैंगिक शोषणानं महाराष्ट्रात खळबळ उडाली असतानाच आता यवतमाळच्या राळेगावमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या सहा महिन्यात तब्बल ३४ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत आणि या मुलींची वेश्याव्यवसायासाठी मुंबई, पुण्यासोबतच बाहेरच्या राज्यातही विक्री केली जात असल्याचा आरोप भाजपने केला आहे. एवढेच नाही तर या प्रकरणात लव्ह जिहादचा संशय भाजपने व्यक्त केला आहे.**



भाजपचे नेते फक्त आरोप करुनच थांबले नाहीत तर त्यांनी मुलींना कशा पद्धतीने फसवले जाते आणि त्यांची कशी विक्री केली जाते, याबाबत रॅकेट कसे सक्रीय आहे याचा कच्चा चिठ्ठाच एका मुलीने तिच्या प्रियकरासोबत बोलताना उघड केल्याचे सांगत आहे. त्यासंदर्भातील कथित कॉल रेकॉर्डिंगही भाजपने जारी केली आहे. खरे तर यवतमाळ जिल्ह्यातील राळेगावसह आदिवासी तालुक्यातून पैशांची लालच दाखवून अल्पवयीन मुलींची विक्री केली जात असल्याचा आरोप करण्यात आला. त्यासंदर्भात आदिवासी विकास मंत्री अशोक उईकेंनी या प्रकरणात कठोर कारवाईचे आदेश पोलिसांना दिले आहेत. त्यानंतर पोलिसांनी माध्यमांसमोर येत वस्तूस्थिती मांडली आहे. राज्यात कथित लव्ह जिहादचे हे पहिलेंच प्रकरण नाही. राज्यात लव्ह जिहादच्या प्रकरणांची मालिकाच सुरु असल्याचे चित्र दिसत आहे. नाशिकच्या ▶▶ पान २ वर

> **प्रकरणाचा पर्दाफाश करण्याची गरज...**
> राळेगावमधील प्रकरणाचे गांभीर्य पाहता ३४ अल्पवयीन मुलींचा शोध घ्यायला हवा. एवढेच नाही तर मुलींची विक्री करणाऱ्या टोळीचा शोध घेऊन त्यांचाही पर्दाफाश करण्याची गरज आहे.

cmyk

## अग्रलेख

# महिला आरक्षण: संख्या पेक्षा सक्षमीकरणाची गरज!

राजकारणात महिलांची वाढती उपस्थिती ही नक्कीच सकारात्मक बदलाची नांदी मानावी लागेल. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाल्यानंतर त्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील अलीकडील नगरपालिका, नगरपंचायत, महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमधील आकडेवारी याची साक्ष देते. हजारोंच्या संख्येने महिला निवडून आल्या आहेत, आणि स्थानिक सत्तेत त्यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. मात्र, या संख्यात्मक वाढीच्या पलीकडे जाऊन गुणात्मक वाढ साध्य करणे ही काळाची खरी गरज आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांवर काम करणाऱ्या असतात. त्यामुळे या पातळीवर महिलांचा सहभाग केवळ प्रतिनिधित्वापुरता मर्यादित न राहता निर्णयक्षमतेत आणि नेतृत्वातही दिसणे अपेक्षित आहे. अनेक महिला सक्षमपणे काम करत असल्या तरी एकूण चित्र पाहता त्यांचे प्रभावी नेतृत्व अद्याप मर्यादित प्रमाणातच दिसते. याचे कारण केवळ संधींचा अभाव नाही, तर सामाजिक, राजकीय आणि मानसिक अडथळ्यांचे जाळेही तितकेच जबाबदार आहे.

आरक्षणामुळे महिलांना राजकारणात प्रवेश मिळाला, पण त्यांना स्वायत्त निर्णयक्षमता मिळते का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अनेक ठिकाणी 'प्रॉक्सी' राजकारणाचे वास्तव अजूनही अस्तित्वात आहे, जिथे निवडून आलेल्या महिलांच्या मागे प्रत्यक्ष निर्णय पुरुषच घेतात. त्यामुळे महिलांच्या सहभागाला खऱ्या अर्थाने सशक्त करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देणे आवश्यक ठरते.

ही समस्या केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. जागतिक पातळीवरही महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व अजूनही अपुरे आहे. विविध आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार जगातील केवळ काही देशांमध्येच महिलांकडे सर्वोच्च सत्ता आहे, तर अनेक देशांमध्ये आजपर्यंत एकही महिला राष्ट्रप्रमुख किंवा सरकारप्रमुख झालेली नाही. संसद आणि मंत्रिमंडळांमध्ये महिलांचे प्रमाण वाढत असले तरी ते अद्याप समाधानकारक नाही. विशेषतः संरक्षण, अर्थ, गृह अशा महत्त्वाच्या मंत्रालयांमध्ये महिलांची उपस्थिती कमी आहे, हे चिंतेचे कारण आहे.

महिलांना राजकारणात केवळ संधीच नव्हे, तर सुरक्षित आणि समान वातावरणाचीही गरज आहे. अनेक महिला प्रतिनिधींना धमक्या, दबाव आणि सामाजिक विरोधाचा सामना करावा लागतो, हे वास्तव नाकारता येणार नाही. समान कायदेशीर हक्क मिळविण्याच्या बाबतीतही अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

भारतामध्ये संसद आणि विधानमंडळात महिलांना आरक्षण देण्याबाबतची घोषणा झाली असली तरी त्याची अंमलबजावणी आणि स्पष्टता अद्याप प्रतीक्षेत आहे. जेव्हा हे आरक्षण प्रत्यक्षात येईल, तेव्हा उच्च स्तरावरील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढेल आणि त्याचा सकारात्मक परिणाम प्रशासनाच्या गुणवत्तेवरही होईल.

एकूणच, महिलांची राजकारणातील वाढ ही स्वागतार्ह असली तरी ती केवळ आकड्यांपुरती मर्यादित राहता कामा नये. महिलांचे खरे सक्षमीकरण हे त्यांच्या नेतृत्वगुणांच्या विकासात, निर्णयक्षमतेत आणि स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण करण्यात आहे. यासाठी समाज, राजकीय व्यवस्था आणि शासन यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. संख्यात्मक वाढीपासून गुणात्मक सक्षमीकरणाकडे जाणे, हाच पुढील वाटचालीचा खरा मार्ग ठरला पाहिजे.

# २०० एकर जंगल जळाल्या प्रकरणी वन अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा-आ.बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**२०० एकर पेक्षा अधिक जंगल व २ लाखाहून अधिक झाडांची राख झाली आहे याप्रकरणी सहाय्यक वन अधिकारी सुदाम मुंडे, क्षेत्र वनाधिकारी श्रीमती नीता फुले यांच्यासह वन विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना गांभीर्य नाही असे दिसून आले आहेत याप्रकरणी या सर्वांना निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करा अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.**



निष्काळजीपणा करून राष्ट्रीय संपत्ती जळू देणाऱ्या दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी, निलंबनासह फौजदारी गुन्हे दाखल झाले पाहिजे वन विभागाचे ६० ते ७० अधिकारी असताना केवळ दोन कर्मचारी आग विझवण्यासाठी आले; अशा गंभीर प्रसंगी सामाजिक वनीकरण विभागाने मदत करणे अपेक्षित होते असे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. शंभू सावरगाव, ढगी, काकडा व मोहाडी या गाव शिवारातील वनपरिक्षेत्र जळून खाक, अधिकारी मात्र कुंभकर्ण सारखे झोपलेले; आग विझवण्याचा प्रयत्नच केला नाही असा आरोप आ. लोणीकर यांनी केला आहे. जालना तालुक्यातील शंभू सावरगाव, ढगी, मोहाडी आणि काकडा या गावांच्या शिवारातील वनक्षेत्रात लागलेल्या भीषण आगीत दोन लाखापेक्षा अधिक झाडे जळून खाक झाले आहेत यासाठी कुंभकर्ण सारखे झोपलेली प्रशासनातले अधिकारी जबाबदार असल्याचा गंभीर आरोप माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केला. या चार गावांमधील वनक्षेत्रात आग लागली असल्याची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नव्हती शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास आमदार बबनराव लोणीकर यांनी रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्रीमती नीता फुले यांना याबाबत माहिती दिल्यानंतर देखील प्रशासन प्रतिनिने काम करेल असे वाटले होते परंतु निगरगठ्ठ अधिकारी मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता घटनास्थळी पोहोचले ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे आज अक्षय तृतीया असताना देखील आमदार लोणीकर यांनी शंभू सावरगाव ढगी काकडा व मोहाडी येथील वनपरिक्षेत्रात आग लागलेल्या ठिकाणी सर्व डोंगरांवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. वनपरिक्षेत्रात लागलेल्या आगीबाबत प्रशासनाने दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष वास्तव यामध्ये मोठी तफावत असल्याचे देखील समोर आले असल्याचे आमदार लोणीकर म्हणाले. लोकप्रतिनिधी आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे १५० एकर जंगल जळाल्याची माहिती दिली परंतु आ. बबनराव लोणीकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर हा आकडा २०० एकरांपेक्षा अधिक असल्याचा गंभीर दावा लोणीकर यांनी केला आहे. या आगीत झालेल्या नुकसानीचा खरा आढावा लपवण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांकडून होत असल्याचा आरोप केला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार ५० हजार झाडे जळाल्याचे सांगितले जात असताना, प्रत्यक्ष पाहणीत २ लाखांपेक्षा अधिक लहान-मोठी झाडे जळून खाक झाल्याचे लोणीकर यांच्या निदर्शनास आले आहे. सागवान, कडुलिंब, पळस, वड, पिंपळ, आंबा यांसारख्या मौल्यवान वृक्षांसह मोठ्या प्रमाणात वनसंपत्ती नष्ट झाली असून, या घटनेमुळे पर्यावरणीय समतोलावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वन्यजीवांचे अधिवासही उद्ध्वस्त झाले असून, ही केवळ आग नसून पर्यावरणीय आपत्ती असल्याचे स्पष्ट झाले आहे. याहूनही धक्कादायक बाब म्हणजे प्रशासनाने सुरुवातीला फक्त शंभू सावरगाव, ढगी आणि काकडा या तीन गावांचा उल्लेख केला होता. मात्र प्रत्यक्ष पाहणीत चौथ्या मोहाडी गावाच्या डोंगराचाही मोठ्या प्रमाणात या आगीत समावेश असल्याचे समोर आले आहे. म्हणजेच आग अधिक व्यापक पसरली असूनही तिचा खरा विस्तार लपवण्यात आल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे. लोणीकर यांनी प्रत्यक्ष डोंगरावर जाऊन या घटनेची पाहणी केली. सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी जालना, क्षेत्र वन अधिकारी जालना यांच्यासह वनपाल वनसंरक्षक या कर्मचाऱ्यांची देखील जबाबदारी आहे की घटनेची माहिती तात्काळ वरिष्ठांना देणे व त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आग विझवण्यासाठी पाण्याचे टँकर किंवा अग्निशामक दलाला पचारण करणे, या सर्व बाबी केल्या असत्या तर निश्चितपणे लवकरात लवकर जंगलला लागलेली आग आटोक्यात आणता आली असती परंतु कुंभकर्णप्रमाणे झोपलेल्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे २०० एकर पेक्षा अधिक जंगल जळून खाक झाले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. या पार्श्वभूमीवर माजी आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे तक्रार करून कडक कारवाईची मागणी केली आहे. यामध्ये सहाय्यक वनसंरक्षक सुदाम मुंडे, रेंज फॉरेस्ट ऑफिसर नीता फुले, वनपाल यमगर आणि वनरक्षक भालेराव यांना या प्रकरणात जबाबदार धरून या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच इतके मोठे नुकसान झाले असल्याचे आमदार लोणीकर यांनी म्हटले आहे या सर्व दोषी अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून विभागीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे. याचबरोबर, वनसंपत्ती, पाऊस पडणारी झाडे, औषधी वनस्पती, इत्यादी राष्ट्रीय संपत्ती मानली जाते, ही राष्ट्रीय संपत्ती नष्ट केल्याप्रकरणी संबंधित सर्व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी भूमिका आमदार बबनराव लोणीकर यांनी घेतली आहे. केवळ कागदी चौकशी न करता विभागीय चौकशी करून दोषींवर कठोर आणि उदाहरणात्मक कारवाई करण्यात यावी, अन्यथा जनतेत तीव्र असंतोष निर्माण होईल, स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून, सुरुवातीपासूनच वनविभागाने योग्य ती उपाययोजना केली असती तर इतक्या मोठ्या प्रमाणावर नुकसान टळू शकले असते, अशी भावना व्यक्त होत आहे. आग लागल्याची माहिती वन प्रशासनाकडे नव्हती तर आग विझवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही त्यामुळे अशा निष्क्रिय अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई करावी अशी ग्रामस्थांची देखील मागणी असल्याचे आ. बबनराव लोणीकर म्हणाले.

# महात्मा बसवेश्वर महाराजांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जातीभेद मोडून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची दखल आजही जग घेत आहे. अशा महापुरुषांचे विचार समाजाला दिशा देणारे असून, आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**



वीरशैव समाजाच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सवानिमित्त ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याला डॉ.योगेश क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, बबनराव गोरे, राजेंद्र बनसोडे, निवासी जिल्हाधिकारी (विभागीय) शिवकुमार स्वामी, नगरसेवक राकेश जाधव, राणा चव्हाण यांच्यासह वीरशैव समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंडपाच्या माध्यमातून लोकशाही आणि समतेची पायाभरणी केली. सामाजिक एकता निर्माण करून समाजात पसरलेली अंधश्रद्धा, विषमता आणि जातीच्या भिंती तोडून सर्वांनी एक समाज म्हणून एकत्र येणे आणि विकास साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे, हे बसवेश्वरांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते. आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. या जयंती निमित्त आयोजित या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला. या कार्यक्रमास शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, अशोक आप्पा पाटील, अनिल मिटकरी, बाळू मिटकरी, उत्तरेश्वर आप्पा कानडे, कुंभेश्वर विभुते, संदीप शेटे, राजेंद्र राजमाने, बंडू शेटे, पंकज पायगुडे, अनंत शहागडकर, दिलीप ढेपे, सचिन परंडकर, चंद्रकांत कानडे, अमर ढेपे, अमोल होनराव, गणेश स्वामी, अमर शेटे, सतीश आप्पा नगरे, सचिन आप्पा शहागडकर, उत्तरेश्वर स्वामी काळेगावकर, गुरुलिंग आप्पा बेदरकर, आंधळकर आप्पा, महेश शेटे, सिद्धेश्वर शहागडकर, संजय घाळे, विलास आप्पा, रवींद्र स्वामी बेदरकर, सचिन रेगुडे, पशुपती मिटकरी यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# सरपंच परिषद सदस्य नोंदणीत 'झंझावाती' कामगिरी अरुणभाऊ कापसे यांचा साताऱ्यात दणदणीत सन्मान



**आष्टी । प्रतिनिधी**

**राज्यभर सरपंच परिषद सदस्य नोंदणी मोहिमेला अभूतपूर्व वेग देत संघटनेचा झेंडा प्रत्येक गावापर्यंत पोहोचवणारे राज्य कोर कमिटी सदस्य अरुणभाऊ कापसे यांचा सातारा येथे दिमाखात सन्मान करण्यात आला.**

कापसे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या झंझावाती मोहिमेमुळे सरपंच परिषदेच्या संघटनात्मक ताकदीत लक्षणीय वाढ झाली असून, राज्यभर परिषद अधिक बळकट होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. सरपंच परिषद ही केवळ संघटना नसून गावपातळीवरील नेतृत्वाचा बुलंद आवाज आहे. या आवाजाला राज्यभर प्रभावी धार देण्याचे काम कापसे यांनी नियोजनबद्ध आणि आक्रमक पद्धतीने केले. जिल्हा, तालुका ते गाव अशा प्रत्येक स्तरावर स्वतः उपस्थित राहून त्यांनी पदाधिकाऱ्यांना एकत्र केले, मतभेद दूर केले आणि हजारो सरपंचांना परिषदेच्या छत्राखाली आणले. त्यांच्या या धडाकेबाज कार्यपद्धतीमुळे परिषदेला नवी ऊर्जा, नवे बळ आणि लढाऊ दिशा मिळाली आहे. या सन्मान सोहळ्याला दत्ताभाऊ काकडे, आनंद जाधव, आबासाहेब सोनवणे, जे. डी. टेमगिरे, शत्रुघ्न धनवडे, नामदेव सावंत यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच पोपटराव पवार आणि जयकुमार गोरे यांच्यासह राज्यभरातील सरपंच व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी कापसे यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले की, ''ही केवळ सदस्य नोंदणी मोहीम नसून सरपंच परिषदेच्या शक्तीचे पुनरुत्थान आहे.'' गावपातळीवरील प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारी आणि हक्कांसाठी लढणारी संघटना म्हणून सरपंच परिषद अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अरुणभाऊ कापसे यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे सरपंच परिषद राज्यात अधिक संघटित, सक्षम आणि आक्रमक बनत असून, ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी ही ताकद आगामी काळात निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

## पान १ वरून...

### कर्जमाफीची घोषणा कागदावरच;

आवश्यक असलेले बियाणे, खत, औषधे यासाठी भांडवल उभे करणे अनेकांना जिकिरीचे ठरत आहे. कर्जमाफीची घोषणा झाली असली तरी पात्रता निकष काय असतील, कोणत्या प्रकारच्या कर्जांचा समावेश केला जाणार, अर्ज प्रक्रिया कशी असेल, याबाबत शासनाकडून कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नाही. या अनिश्चिततेमुळे शेतकरी निर्णय घेण्यात अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, कर्जमाफीच्या अपेक्षेवर अनेक शेतकऱ्यांनी आपले आर्थिक नियोजन केले होते. मात्र निर्णय लांबणीवर पडत असल्याने त्यांच्या आशांवर पाणी फिरण्याची भीती व्यक्त होत आहे. खरीप हंगामाच्या तोंडावरच निर्माण झालेली ही अनिश्चितता शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर घालत आहे.

----------

### अशोक खरातच्या पोलीस

असून त्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्रपणे आणि सखोल चौकशी करणे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने खरातला २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

------------

### मनुस्मृती जपणाऱ्या भाजपची

का? असा खडा सवाल वडेट्टीवार यांनी केला. मनुवादी विचारसरणी आणि मनुस्मृती जपणारे भाजपा महिलांच्या आरक्षणाबाबत किती बनवाबनवी करत आहे हे लोकांना कळून चुकले आहे. २०२३ मध्ये महिला आरक्षण बिल मंजूर झाल्यावर सर्व पक्षांनी त्याला पाठिंबा दिला. बिल मंजूर झाल्यावर पुन्हा परिशीमानाच्या नावावर दाखवायचे आणि खायचे दात वेगळे असे लपून राहिले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण काँग्रेसने आणले. महिला आरक्षणाच्या आड घटनादुरूस्ती करून आपल्या मर्जीने मतदार संघ तयार करणे हा यामागचा छुपा अजेंडा आहे, अशी टीका त्यांनी केली. आसाममध्ये भाजप सरकारने मतदार संघाचे इकडचे तुकडे तिकडे करून आपल्या सोयीने विभागणी केली आहे. पंतप्रधान बोलले हे मगरीच्या डोळ्यातील अश्रू होते. महिलांवरील अत्याचाराची यादी काढली तर जवळपास २० लोक भाजपामध्ये आहेत. त्यांच्यावर कारवाई होत नाही. ह्यांना महिलांचा सन्मान नाही. यांनी कितीही बोंबलले तरी यांना कोणी दाद देणार नाही. चार महिला गोळा करून काँग्रेसला महिला विरोधी दाखवण्याचा प्रयत्न केला तरी काही फरक पडणार नाही. काँग्रेसचा जाज्वल्य इतिहास देशातील महिलेपुढे आहे. महिला आरक्षणाचा विषय तीन दशकापासून सुरू आहे. मनमोहन सिंग आणि इतर सरकार असताना याला विरोध करणारे कोण होते? असा सवालही वडेट्टीवार यांनी केला. नवनीत राणा जातीय विष पेरण्यासाठी पोसलेली आणि पाणी घालून जिवंत ठेवणारी विषवल्ली आहे, अशी जहरी टीका वडेट्टीवार यांनी केली. जात आणि धर्मात भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल. यासाठी पाणी घालून जिवंत ठेवणारी विषवल्ली आहे. महिलांवरील अत्याचारा संदर्भात जात आणि धर्म कुठे येतो? जो असेल तो नालायक आणि हरामखोर असतो. त्याला फाशी झाली पाहिजे. तिथे बुरख्यावाले नव्हते, असे नवनीत राणा कोणत्या आधारावर बोलल्या. तोंडात आले की काहीपण वाफा काढायचे का? या बाईची जीभ जातीयवादी आणि धर्मांध बनली आहे. लोकांनी निवडणुकीत पाडून जिरवली तरी अजून शुद्धीवर यायला तयार नाही. राणा यांना हनुमान चालीसाच्या दोन ओळी बोलता येत नाही, ते हिंदू धर्माच्या गोष्टी बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली. खरात प्रकरणावर ब्र न काढणारी बाई. मुस्लिम तरुण दिसल्याबरोबर बावचाळल्यासारखी बोलते. हे अत्यंत घृणास्पद आहे, असे वडेट्टीवार म्हणाले. खासदार अनिल बोंडे डॉक्टर आहेत. डॉक्टरांनी पेशंटला कुणाच रक्त लावावे हे धर्म पाहून लावले जात नाही. त्या डॉक्टरांची भूमिका निषेधार्य आहे. भाजपचे पुरस्कृत भोंदू तयार झाले आहे. धर्माधर्मात वाद लावणारी धर्मांध शक्ती वाढत चालली आहे. यांना पोसले जात असल्याने ही संख्या वाढत आहे आणि महिला अत्याचारात वाढ होत आहे, असा स्पष्ट आरोप आहे, अशी टीका वडेट्टीवारांनी केली. नवनीत राणा यांनी धर्मांध पसरविण्याचा आणि दोन धर्मात तेढ पसरविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक व्हायला पाहिजे. अनिल बोंडे यांनी चुकीची माहिती पसरवली म्हणून त्यांच्यावरील व्हायला पाहिजे अशी मागणी वडेट्टीवारांनी केली.

----------

### अजित पवारांच्या विमान अपघात

पोलीस ठाण्याकडे देण्यात आला होता. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता, राज्य शासनाने हा तपास सीआयडीकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी कर्नाटक पोलिसांनी नोंदवलेले जबाब आणि गोळा केलेले पुरावे आता सीआयडीच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. बारामतीमध्ये आधीच गुन्हा दाखल असल्याने नवीन एफआयआरची गरज भासणार नाही; सीआयडी जुन्या गुन्ह्याच्या आधारेच पुढील तांत्रिक तपास करणार आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले असून, सीआयडीच्या तपासातून नेमके काय निष्पन्न होते. याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

--------------

### भोंदू राजेंद्र गडगे याचा

शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे. वडगावपान इथे मंत्रोच्चाराने दुर्धर आजार बरे करण्याचा दावा करणाऱ्या भोंदूला गजाआड करण्यात आलं आहे. दत्तधाम सरकार नावाने तो दरबार चालवत होता. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या भोंदूविरोधात गुन्हा दाखल केल्यानंतर संगमनेर पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. आता त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. राजेंद्र गडगेच्या भोंदूगिरीचे अनेक कारनामे समोर आले आहेत. व्यवसायातील नुकसानासह, सांधेदुखी, मणक्याचा त्रास, कॅन्सरसारखे आजार मंत्राने बरे झाल्याचा दावा भोंदू राजेंद्र गडगे करायचा. त्याचे काही व्हिडीओ यूट्यूबवर अपलोड करायचा. गेल्या १० वर्षांपासून राजेंद्र गडगे हा व्यवसाय करत होता. या काळात त्याने शेकडो कुटुंबांचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याची माहिती देखील समोर येत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) राज्य सचिव ॲड. रंजना गवांदे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनंतर संगमनेर तालुका पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. पोलिसांनी मुख्य आरोपी राजेंद्र गडगे याच्यासह मधुकर शिंदे, गडगेची मुलगी ज्ञानेश्वरी गडगे, डॉ. मोहन पुरी आणि सुरज शिंदे यांना अटक केली आहे.

----------------

### फटाक्यांच्या फॅक्टरीत अग्नितांडव

कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली. फटाका कारखान्यात झालेल्या या स्फोटाचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही, मात्र प्राथमिक अंदाजानुसार फटाके तयार करताना सुरक्षा नियमांचे पालन न झाल्यामुळे हा अपघात झाला असावा. अधिकाऱ्यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. स्थानिक प्रशासनाच्या मते, बचावकार्य वेगाने सुरू असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे.

------------

### नाशिक, अमरावतीनंतर

आयटी कंपनीत मुलींचे लैंगिक शोषण आणि धर्मांतर केल्याचे समोर आले आहे, तर परतवाडामध्ये अयान अहमद या १९ वर्षीय तरुणाने ८ मुलींचे लैंगिक शोषण करतानाचे ३५० पेक्षा जास्त आक्षेपार्ह व्हिडीओ आढळून आले आहेत. तर पालघरमध्ये सिकंदर शेख नावाच्या व्यक्तीने अजय म्हस्के नावान २९ वर्षीय महिलेचे शोषण केल्याचे समोर आले आहे.

----------

### बीडच्या विद्यार्थ्याची पुण्यात

सीईओ आणि वॉर्डन यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. अवधूत बडे हा बीड शहरातील आनंद नगर येथील रहिवासी होता. त्याचे आई-वडील दोघेही शिक्षक असून त्याने एनडीए परीक्षेच्या तयारीसाठी यशोतेज ॲकॅडमीत प्रवेश घेतला होता. १० नोव्हेंबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास अवधूतने रूम नंबर ५१३ मध्ये छताच्या पंख्याला बेडशीटच्या साहाय्याने गळफास लावून आपले जीवन संपवले. या घटनेनंतर त्याचे वडील उल्हास म्हातारदेव बडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, अवधूतवर त्याच्या रूममेटचे तीन हजार रुपये चोरी केल्याचा आरोप करण्यात आला होता. यावरून वॉर्डन वसंत तुकाराम सरकटे यांनी अवधूतला ॲकॅडमीतून काढून टाकण्याची (रस्टीकेट) धमकी दिली होती. या मानसिक दबावामुळे आणि भीतीपोटी अवधूत नैराश्यात गेला होता. महत्त्वाचे म्हणजे, अवधूत अल्पवयीन असतानाही अशा परिस्थितीत त्याचे योग्य समुपदेशन करण्यात आले नाही. तसेच, घडलेल्या प्रकाराची माहिती त्याच्या पालकांनाही वेळेत देण्यात आली नाही असा ठपका फिर्यादीत ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी ॲकॅडमीचे संस्थापक व संचालक तेजस पद्माकर पाटील, सीईओ विकास सुरेश पाटील आणि वॉर्डन वसंत तुकाराम सरकटे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०६ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यामुळे एका निष्पाप विद्यार्थ्याला जीव गमवावा लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शंभुराज जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि.२० एप्रिल २०२६


## थोडक्यात

### पलक मुंदडा हिचे सिबीएसई दहावी बोर्ड परिक्षेत उज्वल यश

बीड । प्रतिनिधी



बीड येथील रहिवाशी असलेली व पोदार इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थीनी पलक निलेश मुंदडा हिने दहावी सिबीएसई बोर्ड परिक्षेत ९८.०२ टक्के गुण प्राप्त करत घवघवीत यश मिळविले आहे.

पलक मुंदडा हिने उज्वल यश मिळवत शाळेतून दुसर्या क्रमांकावर येण्याचा मान मिळविला आहे. भरपूर अभ्यास करून पलकने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे पोदार इंटरनॅशनल स्कुलचे संचालक, प्राचार्य, शिक्षीका यांच्यासह पालक, आप्तेष्ट, नातेवाईकांनी अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. भरभरून यश मिळविलेल्या पलक निलेश मुंदडा हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### युसूफवडगांव येथे जयंतीनिमित्ताने महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंती निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालय येथे अभिवादन करण्यात आले. समतेचे नायक लिंगायत धर्म संस्थापक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्ताने युसूफवडगांव ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जेष्ट वकील हनुमंत जाधव,उपसरपंच महेश लामतुरे,सचिन जावळे व बापुसाहेब भुसारी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शिवकुमार कोरसळे,विकास जाधव,छत्रुघन निकम,काशीनाथ खरबड,सोमनाथ लामतुरे,शिवराज थळकरी,ओम लामतुरे,चंद्रकांत सातपुते,सुनिल चोपणे,सिद्धु डोंगरे, बाबु शिंदे,अनिल उजगरे,महादेव मोडवे,दत्ता बाबर,पिंटू मुकदम,राहुल थळकरी,रवी थळकरी,प्रविण थळकरी,संजय लांडगे,विजय राऊत,राजु गायके व पत्रकार सचिन उजगरे हे उपस्थित होते.

### घाटनांदुर येथे जगत ज्योती महात्मा बसेश्वर यांची जयंती वृक्षारोपण करून साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १९ एप्रिल रविवार रोजी महात्मा बसवेश्वर चौक या ठिकाणी जगत ज्योती महात्मा बसेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करून वृक्षारोपण करण्यात आले यावेळी सरपंच महेश आप्पा गारठे, मा. जि प सदस्य दत्ता काका जाधव, गणेश भैय्या देशमुख, दादा वैद्य, धनंजय महाजन, पत्रकार परमेश्वर वैद्य, गजानन साखरे, शिवलिंग महाजन,आकाश महाजन, सुरज शेटे, मेहबूब शेख, गणेश नाईक, लक्ष्मण नाईक, राम जाधव, सर्वलिंग नाईक , देवेंद्र चव्हाण ,उमाकांत मुरुडकर, ऋषीकेश चौधरी, महेश मुरुडकर, ऋषिकेश साखरे व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आ.धस यांचा ड्रीम प्रोजेक्ट हरीत क्रांती घडवून आणणारा

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका हा पारंपरिकपणे दुष्काळी पट्ट्यात मोडतो. पावसाच्या अनियमिततेमुळे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या संकटात होती. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी दूरदृष्टी ठेवत उपसा सिंचन योजनेचे स्वप्न साकार करण्याचा निर्धार केला.

. प्रकल्पाची मूलभूत संकल्पना

आष्टी उपसा सिंचन योजना ही डळषीं खीीळसरींळेप तत्वावर आधारित आहे. नदी/जलाशयातून पाणी उचलणे, पंपिंग स्टेशनद्वारे उंच भागात नेणे, पाइपलाइनद्वारे शेतीपर्यंत वितरण ही योजना नैसर्गिक प्रवाहावर अवलंबून नसून तंत्रज्ञानावर आधारित पाणी व्यवस्थापन प्रणाली आहे.

हा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून ओळख का?

हा प्रकल्प केवळ विकासकाम नाही, तर एक परिवर्तनाची संकल्पना आहे:

दुष्काळमुक्त आष्टी, शाश्वत शेती विकास, शेतकऱ्यांचे स्थिर उत्पन्न, स्थलांतरावर नियंत्रण, ग्रामीण स्वावलंबन म्हणूनच हा प्रकल्प आमदारांच्या राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू आहे.

या प्रकल्पाची तांत्रिक वैशिष्ट्ये

उच्च क्षमतेचे आधुनिक पंपिंग स्टेशन, विस्तृत आणि मजबूत पाइपलाइन नेटवर्क, उंच भौगोलिक भागात पाणी पोहोचवण्याची प्रणाली, ऊर्जाबचत तंत्रज्ञानाचा वापर स्मार्ट नियंत्रण व वितरण यंत्रणा ५ शासन स्तरावरील सहकार्य या योजनेसाठी राज्य स्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्यात



आला. यामध्ये विशेष सहकार्य: उप मुख्यमंत्री व तात्कालीन जलसंपदा मंत्री अजित पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

निधी मंजुरी, प्रशासकीय प्रक्रिया आणि अंमलबजावणीसाठी या सहकार्याची मोठी भूमिका राहिली.. त्या वेळेसचे इंजिनियर अशोक खेडकर यांचे तांत्रिक योगदान ६ नियोजन आणि डिझाइन इंजिनियर अशोक खेडकर यांनी संपूर्ण योजनेचा तांत्रिक आराखडा तयार करताना:

पंपिंग क्षमता, पाइपलाइन रचना, वितरण नेटवर्क यांचे अचूक नियोजन केले.

अंमलबजावणी नियंत्रण

कामाची गुणवत्ता राखली, वेळेत पूर्णत्वावर भर, तांत्रिक अडचणींवर तत्काळ उपाय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा कार्यक्षम पंप

ऑटोमेशन प्रणाली, दीर्घकालीन टिकाऊ उपाययोजना, शेतकरी सहभाग, प्रशिक्षण व मार्गदर्शन, पाणी वापराचे नियोजन, सिंचन व्यवस्थापनाची माहिती, योजनेची गरज आणि पार्श्वभूमी, कमी आणि अनियमित पाऊस , घटती भूजल पातळी, कोरडवाहू शेतीची मर्यादा वाढते कर्जबाजारीपण या सर्व समस्यांवर एकत्रित उपाय म्हणून ही योजना उभी राहिली.

८ शेती क्षेत्रावर परिणाम उत्पादन वाढ

२ ते ३ पट उत्पादन वाढ, विविध पिके घेण्याची संधी, शेतीचे रूपांतर, कोरडवाहू ते सिंचित शेती, नगदी व फळबाग शेतीचा विकास, उत्पन्न वाढ, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य, कर्जाचे प्रमाण कमी, सामाजिक व आर्थिक परिवर्तन, ग्रामीण विकास, गावांमध्ये पायाभूत सुविधा सुधारणा,स्थानिक रोजगार निर्मिती, स्थलांतर कमी

तरुणांचे शहरांकडे जाणे कमी, महिला सक्षमीकरणशेती व पूरक व्यवसायात सहभाग वाढ, सामाजिक स्थैर्य, आर्थिक सुरक्षिततेमुळे सामाजिक समतोल. दीर्घकालीन परिणाम, जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता

शेतीला उद्योगाचा दर्जा, निष्कर्ष आष्टी उपसा सिंचन योजना ही केवळ पाणीपुरवठा योजना नसून ग्रामीण परिवर्तनाची क्रांती आहे.

आमदार सुरेश धस यांची दूरदृष्टी,

राज्यस्तरीय नेतृत्वाचे सहकार्य आणि इंजिनियर अशोक खेडकर यांचे तांत्रिक कौशल्य या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून हा प्रकल्प साकार झाला आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला, तर आष्टी तालुका दुष्काळातून मुक्त होऊन समृद्ध, हिरवागार आणि आत्मनिर्भर बनेल – हेच या ड्रीम प्रोजेक्टचे अंतिम यश आहे.

## कुरेशी यांच्यावर हल्ला करणाऱ्या गोरक्षकाचा जामीन नामंजूर –ॲड. तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

गोवंश हत्येचा केवळ संशय घेऊन कायदा हातात घेणाऱ्या तथाकथित 'गोरक्षकां'ना न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. आष्टी तालुक्यातील बिटकेवाडी परिसरात जनावरांच्या बाजाराला जाणाऱ्या व्यापाऱ्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपींचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडलेला युक्तिवाद आणि सादर केलेले सक्षम पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने हा निर्णय दिला.



७ मार्च २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास खडकत येथील व्यापारी शोएब ताहेर कुरेशी आणि त्यांचे नातेवाईक गुलाम हुसेन शेख हे स्विफ्ट गाडीने आष्टी येथील जनावरांच्या बाजाराकडे निघाले होते. बिटकेवाडी जवळ एका विना क्रमांकाच्या पांढऱ्या बोलेरोने त्यांचा पाठलाग सुरू केला. हनुमंत गाव फाट्याजवळ या बोलेरोने कुरेशी यांच्या गाडीला मागून जोरदार धडक दिली. सदर धडक दिल्या नंतर गाडी थांबताच बोलेरोमधून ५ ते ६ जण खाली उतरले. तुम्ही गायी कापता, तुम्हाला आता दाखवतोच, अशी धमकी देत त्यांनी जबरदस्तीने गाडीची डिकी उघडली. डिकीमध्ये काहीही आक्षेपार्ह आढळले नाही, तरीही आरोपी मनोज फुलारी (रा. शिराढोण ता.आष्टी जि.बीड) याने चाकूने गुलाम हुसेन शेख यांच्या डोक्यात वार केला. या मध्ये फिर्यादी गंभीर जखमी झाले. गंभीर हल्ल्यानंतर आरोपी थांबले नाहीत. त्यांनी जखमी गुलाम हुसेन यांना फरफटत जवळच्या शेतात नेले. तिथे लोखंडी रॉड, फायबरच्या नळ्या आणि फायटरने त्यांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात व्यापाऱ्याचा मोबाईल आणि खिशातील २५,५०० रुपये देखील आरोपींनी जबरदस्तीने काढून घेतले. या प्रकरणी आष्टी पोलिसांनी भारतीय न्याय संहिताच्या कलम १०९: हत्येचा प्रयत्न, कलम ११८(२), ११८(१): घातक शस्त्राने दुखापत करणे, इतर कलमे: ११९(१), ३२४(२), १८९(२), १९१(२), १९० आणि १९१(३). याप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदरील आरोपींनी बीड जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. या अर्जावर सुनावणी दरम्यान फिर्यादीची बाजू मांडताना ॲड. तेजस नेहरकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला. गाडीत कोणत्याही प्रकारचे गोमांस सापडले नसताना केवळ संशयावरून जीवघेणा हल्ला करण्याचा अधिकार या तथाकथित गोरक्षकांना कोणी दिला? असा संतप्त सवाल ॲड. नेहरकर यांनी उपस्थित केला. त्याच बरोबर आरोपींना जामीन मिळाल्यास फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, आरोपी बाहेर आल्यास ते पुराव्यांशी छेडछाड करू शकतात आणि साक्षीदारांवर दबाव आणू शकतात त्यामुळे त्यांचे जमीन नामंजूर करावे अशी विनंती ॲड. नेहरकर यांनी न्यायालयाकडे केली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आणि सादर केलेले पुरावे पाहता, आरोपींचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याचे मत नोंदवले परिणामी, मुख्य आरोपी मनोज फुलारी आणि त्याच्या साथीदार सागर भंबारे चा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. सदरील आरोपींचा जामीन नामंजूर केल्यामुळे कायदा हातात घेणाऱ्या प्रवृत्तींना या निकालामुळे मोठी चपराक बसली असल्याचे बोलले जात आहे.

स्वतःला गोरक्षक म्हणवून घेणाऱ्यांना कायदा हातात घेण्याचा कोणताही अधिकार नाही. खोट्या संशयावरून एखाद्याचा जीव घेण्याचा प्रयत्न करणे हा गंभीर गुन्हा आहे.

– ॲड. तेजस नेहरकर (जिल्हा व सत्र न्यायालय बीड)

## पान ६ वरुन...

### तुलसी फॅशन डिझाईन

या विषयांवरही सखोल चर्चा करण्यात आली. महिलांच्या प्रगतीत येणारे सामाजिक अडथळे कसे दूर करावेत, याबद्दल ड. जाधव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य अश्विनी बेद्रे मॅडम यांनी विद्यार्थिनींना अशा उपक्रमांतून मिळणाऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात वापर करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन व उपस्थितांचे आभार प्रदर्शन रूषालि मॅडम यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

### आष्टी नगरपंचायत

एहराम धारण करणे, काबा भोवती तवाफ (सात फेऱ्या) मारणे, सफा आणि मरवा टेकड्या दरम्यान सई करणे, अराफात पर्वत येथे प्रार्थना करणे, मुजदलिफा येथे मुक्काम, तसेच जमरात ब्रिज येथे रमी जमारात (प्रतीकात्मक दगड मारणे) यांसारखे विविध धार्मिक विधी पार पाडले जातात. याशिवाय कुर्बानी देणे आणि केस कापणे किंवा मुंडण करणे या विधींचाही समावेश असतो.

हज यात्रेमुळे आत्मशुद्धीची भावना दृढ होते, समानतेचा संदेश मिळतो, तसेच संयम, शिस्त आणि अल्लाहप्रती भक्ती वाढीस लागते, असे मानले जाते. भारतातूनही दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक हज कमिटी ऑफ इंडिया मार्फत हज यात्रेसाठी जातात.

यावेळी नगराध्यक्ष जिया बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,जि.प.सदस्य माऊली जरांगे, भाजपा विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक सुरेश वारंगुळे,इर्शान खान, अक्षय धोंडे,भारत मुरकुटे,बाळासाहेब घोडके,ज्ञानदेव राऊत, पत्रकार सचिन रानडे,पत्रकार प्रविण पोकळे,समीर शेख,डॉ.सिद्दीक बेग,इंजि.गहिनीनाथ शिरसाट,लेखापाल जीवन साठे, सोमनाथ साखरे, आदींनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

### बालाजी मंदिरात

विज्ञानाची आवड निर्माण केली. डॉ.सौ.करुणा मोदाणी यांनी मुलांची निःशुल्क आरोग्य तपासणी केली. शिबिरादरम्यान रोज विविध अन्नदात्यांकडून मुलांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. स्नेहल कासट यांनी संपूर्ण शिबिराचे व्हिडिओ चित्रीकरण केले. समारोप कार्यक्रमात शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नमाला इंदाणी यांनी केले. यावेळी तालुका माहेश्वरी सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद बजाज, सचिव पुरूषोत्तम करवा, ज्येष्ठ समाजसेवक गोपीकिशन इंदाणी, डॉ.सुशील लोढा, विष्णुदास मुंदडा, सचिन रेहदासनी व डॉ.सौ.निर्मला बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती. या समरकॅंपमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक मूल्यांची जाणीव वाढीस लागल्याचे पालकांनी समाधान व्यक्त केले.

### महिला आरक्षणाला विरोध

महिंद्र चाटे, उपतालुकाप्रमुख सुग्रीव बसवर, शेतकरी सेना तालुकाप्रमुख आदित्य रांजणकर, विभाग प्रमुख बाबासाहेब डोईफोडे, उपतालुकाप्रमुख योगेश देशमुख, युवा सेना उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर भांगे, संजय गायके, शिवाजी मोहिते, मोहन ढाणे, पोपट लोंढे, संदीप नाईकवाडे, महेश कदम यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी कॉंग्रेसविरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

### दानशूरांच्या पुढाकारातून

मंदिराच्या उभारणीमुळे परिसरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण अधिक बळकट होत असून स्थानिक भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बडेबाबा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करो, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

मंदिर निर्माण कार्य हे केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्याचे प्रतीक असल्याने समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. या पवित्र उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी पुढाकार घेऊन योगदान द्यावे, असे गडाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष सचिव व विश्वस्त तसेच देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## त्याग, समर्पणाची भावना असल्यास जीवनात आनंद मिळतो – तपोनिधी ह.भ.प. नारायण महाराज




बीड । प्रतिनिधी

त्याग, समर्पण भावना, आणि परोपकारी असल्यास जीवनात आनंद मिळतो. जीवन जगताना त्रास झालास श्रीकृष्णाच्या भगवान श्रीकृष्णाच्या चरित्राकडे पहावे आनंद मिळतो, असे प्रतिपादन तपोनिधी ह.भ.प. नारायण महाराज, उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी केले.

'अनंत ब्रम्हांडे उदरी, हरी हा बालक ब्रह्मचारी, नवल केवढे, केवढे नकळे कान्होबाचे कोडे' या संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर तपोनिधी ह.भ.प. नारायण महाराज, यांनी अभ्यासपूर्ण भाविकांना मंत्रमुग्ध करणारे निरूपण केले. गुरुवारी बीड शहरातील अंबिकानगर भागात सारंगकर परिवाराच्या वतीने आयोजित आलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात बोलताना हभ.प. नारायण महाराज म्हणाले, मानवी जीवनात त्रास झाल्यास भगवान श्रीकृष्णाच्या चरित्रकडे पहावे. जीवनात त्यागाची, समर्पणाची भावना असावी. जीवनाकडे त्याग, समर्पण भावना, या वृत्तीने पहावे. श्रीकृष्णाच्या चरित्रांतून आनंद घ्यावा. चित्त चोरीचे आठ प्रकार आहेत. चित्त चोरी महत्त्वाची आहे. मानवी जीवनात आनंद महत्त्वाचा आहे आध्यात्मिक कार्यक्रमातून सुख प्राप्ती होते. कीर्तन, प्रवचन, भजनातून आनंद मिळतो. आपला संसार कसा चालतो, हे काल्याच्या कीर्तनात सांगितले जाते. काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. नारायण महाराज यांनी श्रीकृष्णाच्या, लिला, कार्य याविषयीची निरुपण केले. विविध दृष्टांत देऊन त्यांनी भाविक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सप्ताहासाठी योगदान देणाऱ्या कीर्तनकार, गायनाचार्य, भजनी मंडळ, अन्नदाते, मान्यवरांचा आदींचा सत्कार अजय सारंगकर व सारंगकर परिवाराच्या वतीने करण्यात आला. यावेळी ह.भ.प. अरुण डाके, रामहरी रसाळ गुरुजी, बालाजी नाईकवाडे, सीताराम उबाळे, पत्रकार नारायण नागरे, आदीसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

## मयत कर्जदाराच्या वारसास ७६ हजारांचा विमा धनादेश; बुलडाणा अर्बन शाखेचा सामाजिक उपक्रम

आष्टी । प्रतिनिधी

बुलडाणा अर्बन शाखा आष्टी (जि. बीड) यांच्या वतीने मयत कर्जदार सभासदाच्या वारसास अपघाती विमा योजनेअंतर्गत धनादेश वितरण करण्यात आले. सहकाराची परंपरा जपत सामाजिक बांधिलकीची जोड देत ग्राहक, लघु उद्योजक व शेतकरी सभासदांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या या संस्थेच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मु.पो. आष्टी येथील रहिवासी व संस्थेचे सभासद स्व. शैलेश पांडुरंग जरांगे यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी शाखेतून रुपये ७४,००० चे सोनेतारण कर्ज घेतले होते. दरम्यान, दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांचा इलेक्ट्रिक शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला. संस्थेच्या धोरणानुसार कर्जदारास कर्ज रकमेएवढे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते.

घटनेची माहिती मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.



राधेश्यामजी चांडक (भाईजी), अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर व सरव्यवस्थापक कैलासजी कासट यांच्या आदेशानुसार तसेच विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक सचिन गायकवाड यांनी जरांगे कुटुंबीयांचे सांत्वन करून विमा प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर करण्यात आला.

या योजनेअंतर्गत खउखउख डेलरीव कंपनीकडून कर्जाच्या व्याजासह एकूण रुपये ७६,१६३ चा विमा दावा मंजूर करण्यात आला. त्यानुसार दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी मयत सभासदाच्या वारसदार सौ. कमल पांडुरंग जरांगे यांना सोनेतारण कर्ज खात्यातील सोने वस्तू परत देण्यात आल्या.यावेळी विभागीय व्यवस्थापक माधव मगर, सभासद रामचंद्र तांबे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शाखा व्यवस्थापक सचिन गायकवाड व शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## जय जवान मा.विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित... संस्थेचे जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड या विद्यालयात भारतरत्न, विश्ववंदनीय, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती मोठ्या उत्साहामध्ये व आनंदात साजरी करण्यात आली.

सदरील कार्यक्रमास सर्वप्रथम विश्ववंदनीय भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन प्रतिमेस उपस्थित मान्यवर मा.श्री. बशीर शेख सरपंच , मा.श्री संदिपान आप्पा खळगे मा. पंचायत समिती सदस्य, मा. श्री बबन मांजरे संचालक कृ.ऊ.बा.समिती, मा.श्री. बाबासाहेब राऊत मा.श्री.रावसाहेब राऊत मा.श्री.बाबासाहेब साळवे भीम जयंती उत्सव समिती,उपस्थित सर्व मान्यवर



अतिथी गण प्रतिष्ठित व्यक्ती पालक वर्ग तसेच विद्यालयातील प्राचार्य श्री.सारोक्ते डी.जी सर आदी सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पावन प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर व्यक्तींचे शब्द सुमनाने विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या छोट्या भाषणातून आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उपस्थित मान्यवर प्रमुख पाहुणे,इतर मान्यवर व्यक्ती यांनी आपले मनोगत व्यक्त करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, थोर समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञ होते. त्यांनी अस्पृश्यता निवारण, दलित व शोषित वर्गाला हक्क मिळवून देणे, कामगारांचे कल्याण आणि महिला सक्षमीकरणासाठी आयुष्यभर लढा दिला. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून त्यांनी 'हिंदू कोड बिल' द्वारे महिलांना मालमत्तेचा अधिकार मिळवून दिला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे प्रमुख पैलू:

संविधान निर्मिती: भारतीय संविधानाचे जनक (उहळशष –'लिहळींशलीं) म्हणून त्यांनी देशातील सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा अधिकार मिळवून दिला

सामाजिक समता: अस्पृश्यता निर्मूलनासाठी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (१९२७) आणि नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह यांसारखे ऐतिहासिक लढे उभारले

महिला सक्षमीकरण: हिंदू कोड बिलाद्वारे महिलांना शिक्षणाचा, मालमत्तेचा आणि समान हक्क मिळवून देण्याचे मोठे कार्य केले

कामगार कल्याण: मजूरमंत्री असताना त्यांनी कामगारांसाठी कामाचे तास कमी करणे, महागाई भत्ता, कर्मचारी विमा आणि इतर अनेक सुधारणा केल्या

शिक्षण आणि प्रबोधन: 'शिक्षित व्हा, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र देऊन त्यांनी शोषित वर्गात जागृती निर्माण केली. अर्थशास्त्रज्ञ: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (ठइख) स्थापनेत त्यांच्या विचारांचा आणि 'दि प्रॉब्लेम ऑफ द रुपया' या ग्रंथाचा मोठा वाटा होता

धम्म परिवर्तन: १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार करून समानता आणि मानवतेचा मार्ग दाखवला

त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. असे विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.गावातील माननीय सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटी चेअरमन, शिक्षण प्रेमी, प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, पालक वर्ग, माजी विद्यार्थी संघ, तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व उपस्थित होते. आणि शेवटी उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती यांचे सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता झाली.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि. २० एप्रिल २०२६



# छत्रपती संभाजीनगरमध्ये बियाण्यांचे १७, खताचे ८९ परवाने निलंबित

संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मागील आर्थिक वर्षात कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या कारवायांमध्ये बियाणे विक्री करणाऱ्या १७, तर खत विक्री करणाऱ्या ८९ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले, अशी माहिती जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांनी दिली.

पाटील यांनी सांगितले की, खत उपलब्धता, जादा दराने विक्री तसेच बनावट खत विक्रीबाबतच्या तक्रारींच्या निवारणासाठी जिल्हा व तालुका स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच जिल्हास्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना शासनमान्य दरात खते व बियाणे उपलब्ध करून देण्याबाबत सर्व कृषी सेवा केंद्र संचालकांना सूचना करण्यात आल्या आहेत. शासनमान्य दरापेक्षा जास्त दराने विक्री करणे, तसेच 'लिंकिंग' करणे आढळल्यास संबंधित कृषी सेवा केंद्रांवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मागील आर्थिक वर्षात कृषी विभागामार्फत व्यापक प्रमाणात कारवाया करण्यात आल्या. त्यामध्ये बियाणे विक्री संदर्भात १७ परवाने निलंबित करण्यात आले, तर ६ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. याशिवाय एका प्रकरणात गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आला. खत विक्री प्रकरणात ८९ परवाने निलंबित करण्यात आले असून १३ कृषी सेवा केंद्रांना ताकीद देण्यात आली. तसेच ४ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले असून ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कीटकनाशक विक्री संदर्भात ४ परवाने निलंबित करण्यात आले, एका कृषी सेवा केंद्राला ताकीद देण्यात आली, तर ६ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली. शेतकऱ्यांना त्यांच्या परिसरातील कृषी सेवा केंद्रांमधील खत उपलब्धतेची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत ब्लॉग तयार करण्यात आला आहे. तसेच क्यूआर कोडही उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कोडच्या माध्यमातून शेतकरी आपल्या भागातील कृषी सेवा केंद्रांवर उपलब्ध असलेली खते व त्यांचा साठा घरबसल्या पाहू शकतात. प्रत्येक कृषी सेवा केंद्राच्या दर्शनी भागात तक्रार नोंदविण्यासाठी राज्यस्तरीय व्हॉट्सॲप क्रमांक, जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक, मोहीम अधिकारी, नियंत्रण निरीक्षक तसेच तालुकास्तरीय गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक असलेले पोस्टर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.




### परभणी जिल्ह्यातील ९ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित

परभणी जिल्हा कृषी विभागाने तपासणी मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जिल्ह्यातील ९ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले त्यात परभणी, मानवत, पाथरी तालुक्यातील प्रत्येकी २, सेलू, गंगाखेड, पालम तालुक्यातील प्रत्येकी १ परवानाधारक कृषी निविष्ठा विक्री केंद्राचा समावेश आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी स्वप्नील जाधवर यांच्या दालनात सुनावणी पार पडली. यावेळी जिल्हा कृषी विकास अधिकारी दीपक सामाले, जिल्हा गुण नियंत्रक गोविंद काळे, तालुका गुण निरीक्षक उपस्थित होते. सुनावणीदरम्यान संबंधित केंद्रचालकांनी सादर केलेले खुलासे असमाधानकारक आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. तपासणी व सुनावणीदरम्यान अनेक गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या. काही विक्रेत्यांनी ई-पॉस यंत्रणेतील व्यवहारात तफावत ठेवत कंपन्यांकडून प्राप्त 'ॲकनॉलेजमेंट' वेळेत स्वीकारले नव्हते. यंत्रणेमधील नोंदणीकृत साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये मोठी विसंगती आढळली.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६५७ : न्यूयॉर्कमधील ज्यू व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले.
१७१३ : मुघल शासक जहांदार शाह दिल्लीच्या गादीवर बसले.
१७७० : प्रसिद्ध दर्यावर्दी सागर संशोधक कॅप्टन जेम्स कूक यांनी ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.
१७७७ : न्यूयार्कने ब्रिटन देशाकडून आपल्या स्वता:च्या स्वातंत्र्याची घोषणा करून एक स्वतंत्रित राज्याच्या रूपाने आपले नवीन संविधान स्वीकारले.
१९३९ : ॲडॉल्फ हिटलरचा ५० वा वाढदिवस जर्मनीमध्ये सार्वजनिक सुटी देऊन साजरा करण्यात आला.
१९४० : आरसीए द्वारा पहिला इलेक्ट्रोनिक्स माईक्रोस्कोप दाखवण्यात आला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजांनी लाइपझिग शहराचा ताबा घेतला.
१९४६ : राष्ट्रसंघ ही संस्था बरखास्त करून पुढे याचेच संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये रूपांतर झाले.
१९९२ : खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी जगातील सर्वात मोठी व भारतातील पहिली अँटेना पुणे जिल्ह्यातील नारायणगाव जवळील खोडद येथे उभारली गेली.
१९९७ : भारतीय क्रांतिकारक व राजनेता इंद्रकुमार गुजराल भारताचे १२ वे पंतप्रधान बनले.
२००८ : डॅनिका पॅट्रिक ह्या इंडी कार रेस जिंकण्याच्या पहिल्या महिला चालक झाल्या.
२०११ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने आपल्या उपग्रह प्रक्षेपण वाहन 'पीएसएलव्ही' च्या साह्याने तीन उपग्रह यशस्वीपणे अवकाशात पाठवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५७० : मोहम्मद पैगंबर, इस्लाम धर्माचा संस्थापक.
७८८ : आद्य श्री शंकराचार्य यांचा जन्म
१७४९ : मराठा सत्तेचा ध्वज अटकेपार नेणार्या पेशव्यांचे श्रद्धास्थान असलेल्या देवदेवेश्वर मंदिराची नानासाहेब पेशवे यांनी पर्वतीवर स्थापना केली.
१८०८ : फ्रान्सचे पहिले अध्यक्ष नेपोलियन (तिसरे) यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १८७३)
१८७० : पाकिस्तानी विद्वान आणि भाषाशास्त्रज्ञ तसचं, उर्दू भाषेचे जनक मौलवी अब्दुल हक यांचा जन्मदिन.
१९३९ : ध्रुपद गायक सईदुद्दीन डागर यांचा जन्म.
१८८९ : साली जर्मन शासक व 'राष्ट्रीय समजवादी जर्मन कामगार पक्ष' नेता एडोल्फ हिटलर यांचा जन्मदिन.
१८९६ : सार्थ ज्ञानेश्वरी चे लेखक प्रा. ह. भ. प. शंकर वामन उर्फ सोनोपंत (मामासाहेब) दांडेकर यांचा माहीम, ठाणे येथे जन्म. (मृत्यू: ९ जुलै १९६८)
१८९७ : भारतीय वैदिक अभ्यासक, इंडोलॉजिस्ट पंडित सुधाकर चतुर्वेदी यांचा जन्मदिन.
१९१४ : गोपीनाथ मोहांती, उडिया लेखक.
१९२० : पद्मश्री पुरस्कार प्राप्त भारतीय भजन गायिका ज्योतिका रॉय यांचा जन्मदिन.
१९२४ : हिंदी साहित्याचे प्रसिद्ध समीक्षक आणि पीपल्स राइटर्स असोसिएशनचे संस्थापक व सरचिटणीस चंद्रबली सिंह यांचा जन्मदिन.
१९५० : एन. चंद्रबाबू नायडू, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री.
१९६५ : मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री व मेघालय राज्यातील विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते मुकुल एम. संगमा यांचा जन्मदिन.
१९६६ : याहू चे सहसंस्थापक डेव्हिड फिलो यांचा जन्म.
१९८० : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक अरीन पॉल यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : गॉथिक भयपट कादंबरी ड्रेकुलासाठी प्रख्यात असलेले आयरिश लेखक अब्राहम ''ब्रैम'' स्टोकर यांचे निधन.
१९१८ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल ब्राऊन यांचे निधन. (जन्म: ६ जून १८५०)
१९३८ : न्यायाधीश व कायदेपंडित चिंतामणराव वैद्य यांचे निधन. (जन्म: १८ ऑक्टोबर १८६१)
१९६० : सुप्रसिध्द बासरीवादक पन्नालाल घोष.
१९७० : गीतकार आणि शायर शकील बदायूँनी याचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १९१६ बदायूँ, उत्तर प्रदेश)
१९६८ : सुप्रसिध्द भारताचार्य चिंतामणराव विनायक वैद्य.
१९९९ : रुचिरा पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई कृष्णाजी ओगले याचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९१३)
२००२ : राधाकृष्ण: एक जीवनी आणि जवाहरलाल: एक जीवानीचे लेखक व प्रसिद्ध भारतीय इतिहासकार सर्वपल्ली गोपाल यांचे निधन.
२००४ : भारतीय पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय लोक कलाकार आणि शास्त्रीय गायक कोमल कोठारी यांचे निधन.

## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव आणि एकात्मिक नियंत्रण उपाय

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांचेमार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या? सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.



पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय :उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## उष्णतेचे आंब्यावर होणारे दुष्परिणाम : संरक्षण आणि उपाय

सध्या राज्यात उष्णतेत वाढ होताना दिसत आहे. विविध फळबागेत यामुळे दुष्परिणाम दिसून येत आहेत. विशेषत: आंबा फळपिकाचे यामुळे नुकसान होताना दिसत आहे. जर तुम्हाला उष्णतेच्या लाटेपासून आंब्याचे संरक्षण करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आंबा बागेत काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. जेणेकरुन त्यांच्यावर वेळीच उपचार करून चांगले उत्पादन घेऊन ताजे आंबे मिळू शकतील.

उन्हाळ्यात आंबा खायला जवळपास सर्वांनाच आवडतो. उष्मा वाढला की बाजारात आंब्याची मागणीही वाढते. पण तुम्हाला माहीत आहे का की आंब्यालाही माणसांप्रमाणेच उष्माघाताचा त्रास होतो. आता हे कसे घडू शकते असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. फळाला उष्माघात कसा होऊ शकतो? पण हे पूर्णपणे खरे आहे. फळांचा राजा म्हटल्या जाणाऱ्या आंब्यालाही उष्माघाताचा झटका बसतो. उष्माघातामुळे आंब्याचा आकार लहान होऊन तो सुकायलाही लागतो. त्याचप्रमाणे आंबा झाडावर असताना त्या काळात फळाला उष्माघात झाला तर तो सुकून अकाली गळून पडतो. अशा परिस्थितीत आंब्याला उष्माघात झाल्यास शेतकऱ्यांनी काय करावे हे जाणून घेऊया.

उष्माघाताचे आंब्यावर परिणाम : हवेतील ओलावा नसल्यामुळे आंब्याच्या फळांमध्ये उष्णतेची लाट येण्याच्या तक्रारी वारंवार दिसून येतात. यामुळे खालील प्रमाणे परिणाम दिसतात.

आंब्याच्या उष्णतेमुळे फळे लवकर फुटतात. उष्माघातानंतर आंब्यात गोडवा उरला नाही. आंब्याचा आकारही लहान राहतो.

उष्णतेच्या लाटेपासून आंब्याचे संरक्षण उपाय : उष्माघातापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी, बागेत स्प्रिंकलरने फवारणी करावी. जेणेकरून फळांमध्ये ओलावा टिकून राहील. याशिवाय आवश्यकतेनुसार आंबा बागेत ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा, जेणेकरून झाडांना सतत सिंचन होत राहते. उष्णतेच्या लाटेपासून आंबा बागेचे आणि फळांचे संरक्षण करण्यासाठी औषधांची फवारणी करणे शक्य नाही. आंबा बागेत ओलावा जितका जास्त असेल तितकी फळे उष्णतेपासून सुरक्षित राहतील. त्यामुळे शेतकर्यांनी आंबा बागांना वेळोवेळी पाणी द्यावे. आंब्याच्या बागांना वेळोवेळी पाणी दिल्यास आंब्याचे उत्पादन आणि फळांचा आकारही वाढतो.




## गोठ्यात तयार करा नैसर्गिक गारवा, जनावरांसाठी उन्हाळा होईल सुसह्य!

शेतकरी मित्रांनो उन्हाळा सुरु झाला की ज्या प्रमाणे आपण आपली काळजी घेतो त्याप्रमाणे आपल्या पशुधनाची सुद्धा काळजी घेणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात जनावरांना देखील मोठा त्रास होतो. यावेळी गोठा व्यवस्थापन असे करावे की नैसर्गिक गारवा गोठ्यात तयार झाला पाहिजे. उन्हाळयामध्ये जनावरांची योग्य व्यवस्थापन करुन उष्णतेचा ताण कमी करून उत्पादन टिकवून ठेवण महत्वाच असते. जनावरांचे शरिरामध्ये त्यांनी खाल्लेले अन्न, शरिरात साठविलेली चरबी व पोटामध्ये होणारी आबवणक्रिया इत्यादी कारणांनी ऊर्जा निर्माण होते. शरीरात निर्माण झालेल्या उर्जेचा उपयोग शरिरक्रिया चालू ठेवणेसाठी होत असतो, त्याशिवाय अतिरिक्त ऊर्जा जनावराचे शरिर वाढीसाठी व दुधउत्पादन वाढीसाठी उपयोगी असते.

उन्हाळ्यात गोठ्यातील व्यवस्थापन : उन्हाळी हंगामात हवा गरम होऊन तापमान वाढते. पशुधनाच्या शेडच्या पत्र्यावर गवताचे किंवा ऊसाच्या पाचटाचे आच्छादन केल्यास शेडचा पत्रा तापत नाही. या प्रक्रियेमुळे शेडमधील तापमान योग्य राहण्यास मदत होते. गाय व म्हैस या पशुधनामध्ये उन्हाळा ऋतूमध्ये माजावर येण्याचे प्रमाण कमी होते. यासाठी केवळ चाऱ्याची कमतरता हेच एकमेव कारण नसून गोठा व्यवस्थापन देखील तेवढेच महत्वाचे आहे. गोठयाचे व्यवस्थापन असे करावे की, गोठयातील तापमानामध्ये घट होऊन तापमान आर्द्रता निर्देशांक वाढणार नाही व पर्यायी ऊर्जा संवंर्धीत होऊन गाय व म्हैस माजावर येण्याचे प्रमाण सातत्याने टिकून राहील.

अशा प्रकारे गोठ्यात येईल नैसर्गिक गारवा : पत्र्याचा ऊसाचे पाचट किंवा इतर आच्छादन करणे गरजेचे असते. जनावरांना गोठयामध्ये थंड जागी किंवा झाडाखाली बांधावे. गोठयाच्या छपरावर गवत, पाला पाचोळा टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहातो. एकाच गोठयात जास्त जनावरांना एकत्र डांबून गर्दी केल्यास उष्माघात चा त्रास होऊ शकतो. शक्य झाल्यास खिडक्यांना पोती ओली करून लटकवा. त्यामुळे गोठ्यात हवा बाहेरून प्रवेश करताना थंड होऊन आत जाईल आणि गारवा निर्माण होईल



उन्हाळ्यात जनावरांची घ्या काळजी : उन्हाळयामध्ये जनावरांना ३-४ वेळा थंड पाणी पाजावे. आहारामध्ये वाढीव क्षार मिश्रणाचा वापर करावा. जनावरांना उन्हाळयात दुपारच्या वेळेस चरण्यासाठी पाठवू नये. गोठयामध्ये अधूनमधून पाणी फवारावे. रात्री व पहाटेच्या समयी वाळलेली वैरण भरपूर द्यावी. दुपारच्या प्रहरी हिरवी मका, चवळी, कडवळ, लसूण घास यासारखी पोषक वेरणा दयावी. त्यामुळ दूध उत्पादन सातत्य टिकून राहते व प्रजनन क्षमताही सुधारते. खादयातून अ जीवनसत्वाचा पुरवठा करण्यासाठी जास्तीत जास्त हिरवा चारा द्यावा. उन्हाळयात जनावरांना लाळखुरकूत त व फऱ्या या सारख्या रोगांची रोगप्रतिबंधक लस योग्य वेळी टोचून घेणे गरजचे आहे. दुभत्या जनावरांप्रमाण लहान वासर, कालवडी, पारडया, भाकड जनावर व गाभण जनावरे यांच ह योग्य ती काळजी घ्यावी त्यामुळे निश्चितच फायदा होईल.

माजावर आलेल्या जनावरांची घ्या विशेष काळजी : उन्हाळयामध्ये माजाचा कालावधी कमी असतो. बऱ्याच वेळा मुकामाज जाणवतो. म्हशीमध्ये हे प्रमाण जास्त प्रमाणात आढळते. त्यासाठी थंड प्रहरी जनावरांचे बारकाईने निरिक्षण करुन माजाची लक्षणे पहाणे किंवा खच्चीकरण केलेला वळू जनावरामाग फिरवून माजावरील जनावरे ओळखता येतील. माजावर आलेली जनावरे दुपारच्या वेळेस न भरवता त्याऐवजी सकाळी किंवा उन्हाची तीव्रता कमी झाल्यावर भरविल्यास गर्भधारणीचे प्रमाण वाढून जनावर उन्हाळयातही गाभण राहतील.





# बीड वाळूमाफियाची अंबड हद्दीमध्ये घुसखोरी
# महसूल विभागाची वाळू घाटावर कारवाई

अंबड। प्रतिनिधी

बीडमधील वाळू घाटधारकांकडून जालना जिल्ह्याच्या वाळू चोरीची घटना उघडकीस अंबड तालुक्यातील साष्ट पिंपळगाव येथील वाळू घाट क्रमांक १ वर झालेल्या तक्रारीवरून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल , उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली, तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कारवाई केली आहे. या तपासणीत जालना जिल्ह्याच्या हद्दीतील वाळू बीड जिल्ह्यातील घाटधारकांनी बेकायदेशीरपणे पळवल्याचे तसेच घाटावर यंत्रांचा नियमबाह्य वापर होत असल्याचे अत्यंत गंभीर प्रकार समोर आले आहेत. जिल्हा हद्दीचे उल्लंघन व वाळू चोरी बीड जिल्ह्यातील वाळू घाटधारकांनी जालना जिल्ह्याच्या हद्दीतील साष्ट पिंपळगाव शिवारातून चक्क केनीच्या (दोरीच्या) सहाय्यानेअवैध आणि विनापरवाना वाळू उपसा करून ती बीड जिल्ह्यामध्ये ओढून



नेल्याचे निदर्शनास आले आहे. जालना जिल्ह्याची वाळू अशा प्रकारे नियमबाह्य पद्धतीने पळवल्याबद्दल संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

यंत्रांचा (डोजर व मशिन) बेकायदेशीर वापर साष्ट पिंपळगाव येथील घाट क्रमांक एक या वाळू घाटावर केवळ मजुरांच्या सहाय्याने काम करणे अपेक्षित असताना, तिथे डोजर आणि मशिनचा वापर केल्याचे दिसून आले आहे. तपासणी दरम्यान मशिन फिरल्याच्या खुणा जागेवर आढळल्या असून, डोजरच्या साहाय्याने सुमारे २५ फूट उंचीचे रेतीचे मोठे ढिगारे (अंदाजे ५० ब्रास क्षमता) तयार करण्यात आले होते.उत्खनन नोंदणीत मोठी तफावत ईटीपी () रजिस्टरच्या नोंदीनुसार १८ एप्रिल २०२६ पर्यंत केवळ ३,५४४ ब्रास वाळू उपसा झाल्याची नोंद आहे. मात्र, प्रत्यक्ष जागेची पाहणी आणि नजरी आकलन केले असता, हा उपसा दाखविण्यात आल्यापेक्षा जास्त झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. वास्तविक उपसाची कोणतीही अचूक नोंद टेंडर धारकाकडून ठेवली जात नसल्याचेही स्पष्ट झाले आहे.

सदर प्रकरणात मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे एक वाहन जप्त या तपासणी दरम्यान विनापरवाना आणि विनापावती वाळू वाहतूक करणारा एक हायवा ट्रक पथकाने पकडून तहसील कार्यालय, अंबड येथे जप्त केला आहे. आगामी प्रशासकीय पावले आणि कडक इशारासंयुक्त ईटीएस () मोजणी तहसीलदार विजय चव्हाण यांनी साष्ट पिंपळगाव घाटासह तालुक्यातील सर्वच वाळू घाटांची ईटीएस मोजणी करण्याचे आदेश दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, भूमी अभिलेख आणि महसूल विभागाचे संयुक्त पथक ही मोजणी करून सविस्तर अहवाल सादर करण्यात येणार आहे

कायदेशीर कारवाई व नोटीस स्थानिक पथकाचा अहवाल आणि ईटीएस मोजणीचा अहवाल प्राप्त होताच, संबंधित दोषींना नोटीस देऊन त्यांचा खुलासा घेतला जाईल आणि त्यानंतर खुलासा समाधानकारक नसल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. समन्वय व सुरक्षा बीड जिल्हा प्रशासनास याबाबत अधिकृत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, घाटावर स्थिर पथक, पोलीस बंदोबस्त आणि आरटीओ विभागाचे कर्मचारी तैनात करण्याबाबत लेखी पत्रे देण्यात आली आहेत. बळेगाव व साष्ट पिंपळगाव येथील घाट क्रमांक एक मोजणी अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रशासकीय उपाययोजना म्हणून तात्पुरते बंद ठेवण्याचे सांगण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील घाटधारक यांनी डोमलगाव येथुन केनीचा वापर करून रेती उत्खनन केले असल्याबाबत निष्पन्न झाले असून त्यांच्या विरुद्ध सुधा कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.स्थिर पथक. सदर रेती वाहतूक करणारी वाहने व तपासण्याकरिता स्थिर पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच सदर पथकात पोलीस, विभाग तसेच पोलीस पाटील यांचाही समावेश करण्यात आला आहे. विनक्रमांक व ओव्हरलोड वाहने तपासणी करून कार्यवाही करण्यात यावी याकरिता पोलीस विभाग व विभाग यांना त्यांची पथके स्थापन करण्यात यावी यासाठी यापूर्वीच पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्याचे स्मरणपत्र ही देण्यात आले आहे.. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. साष्ट पिंपळगाव घाटावरील नियमबाह्य उत्खननाचे व्हिडिओ आणि फोटो पुरावे म्हणून प्राप्त झाले आहेत. कोणत्याही घाटधारकाने अटींचे उल्लंघन केल्यास त्यांची गय केली जाणार नाही.

## मर्चंट बँक प्रकरणी चेअरमनसह सर्व संचालकांची एसआयटी मार्फत चौकशी करून नार्को टेस्ट करा!




जालना। प्रतिनिधी

नियमबाह्य कर्ज वाटप आणि रिझर्व बँकेच्या बंधनामुळे गाजत असलेल्या प्रतिष्ठीत स्व .मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस्? को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ज्येष्ठ संचालकांनी बँकेचे चेअरमन आणि सर्व एका संचालकाच्या मनमानी कारभाराविरुद्ध दंड थोपाटले असून बँकेचे वाटोळे करण्यास नियमानुसार चेअरमन गोपाल अग्रवाल सहसर्व संचालक यांची एसआयटी मार्फत चौकशी करून नार्को टेस्ट करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.जबाबदार असले तरी खरे झरीतले शुक्राचार्य चेअरमन सी .ए.गोपाल अग्रवाल आणि संचालक जितेंद्र अग्रवाल हेच असल्याचा थेट आरोप बँकेचे संचालक सुभाष देवीदान यांनी आज केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सुभाष देवीदान यांनी सांगितले की, वेअर हाऊस कर्ज वाटप करतांना रिझर्व बँकेच्या नियमानुसार किरायाच्या वेअर हाऊस मधील मालावर तारण कर्ज देता येत नाही .वेअरहाऊस कर्ज देतांना तेथील मालाची तपासणी करून मालावर बँकेचे टॅग लावणे आवश्यक आहे. केवळ कर्जदाराने दिलेली पावती ग्राह्य धरून सदरील पावतीची शहानिशा करण्यात आली का? नियमबाह्यपणे कर्ज वाटप करतांना संचालक मंडळास कुठेही विश्वासात घेण्यात आले नाही, असा आरोप सुभाषचंद्र देवीदान यांनी केला. ५४ कोटींचे कर्ज वाटप करतांना वेअर हाऊस मध्ये दीड लाख क्विंटल माल असणे अपेक्षित आहे. याची शहानिशा करण्यात आली का? नियमानुसार मालाचे नूतनीकरण का केले नाही ? वेअर हाऊस च्या ठिकाणी बँकेचे कर्मचारी का नव्हते? प्रत्येक महिन्याला बँकेचे अंतर्गत लेखापरीक्षक तपासणी करत होते का? जर लेखापरीक्षण केले असेल तर लेखापरीक्षणाचा अहवाल कुठे आहे ? असे अनेक प्रश्न उपस्थित करत सुभाष देवीदान यांनी या सर्व गौडबंगालाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करावी अशी मागणीही देवीदान यांनी केली आहे.

### वेअर हाऊस कर्जाचा आग्रह का?

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखापरीक्षानंतर रिझर्व बँकेचे लेखापरीक्षक अनुराग बलिहार यांनी बँकेने वेअर हाऊस चे कर्ज कमी करावे. गृह कर्ज ,वाहन कर्ज, सोनेतारण कर्ज वाटपावर लक्ष केंद्रित करून ही कर्जे वाढवावी असे निर्देश दिले असतांनाही वेअर हाऊस कर्ज कमी करण्याऐवजी त्यात वाढ करण्यामागे काय हेतू होता.असा प्रश्न सुभाष देवीदान यांनी उपस्थित केला आहे.

## माहेश्वरी सभेची नवीन कार्यकारिणी जाहीर
## अध्यक्षपदी राजेश मणियार तर सचिव सचिन साबू

मंठा । प्रतिनिधी

अखिल भारतीय माहेश्वरी सभा ता. मंठा नूतन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. अध्यक्षपदी राजेश मणियार, कार्याध्यक्ष शरद मुरक्या, उपाध्यक्ष आशिष भांगडिया आणि सचिवपदी सचिन साबू यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे समाजबांधवांनी स्वागत केले. जालना येथील माहेश्वरी सभेचे प्रदेश पदाधिकारी संजय दाड व विजय राठी, जालना जिल्हा निवडणूक अधिकारी प्रसाद झंवर, श्यामसुंदर लोया, जालना जिल्हाध्यक्ष दामोदर बजाज, जिल्हा सचिव दिलीप चेचाणी, व दिलीप सारडा यांच्या उपस्थितीत सर्वानुमते मंठा येथील कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश मणियार यांनी सांगितले की, ''पूर्वीचे तालुका अध्यक्ष दत्तप्रसाद झंवर यांचा कार्यकाळ अत्यंत उत्कृष्ट राहिला आहे. त्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि सहकार्य आम्हाला पुढील कामकाजात निश्चितच उपयोगी पडेल.'' असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी अध्यक्ष दत्तप्रसाद झंवर म्हणाले की, ''माझ्या कार्यकाळात सर्व समाजबांधवांनी दिलेले सहकार्य अमूल्य होते. नवीन कार्यकारिणी अधिक जोमाने व एकजुटीने काम करून समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देईल, असा मला विश्वास आहे असे सांगितले.

या निवडीबद्दल जुगलकिशोर कासट, बालाप्रसाद मणियार, श्रीराम लखोटिया, आनंदाराम सोमाणी, संजय छल्लाणी, बाबुजी तिवारी, पत्रकार संतोष दायमा, जगदीश लखोटिया, ब्रिजगोपाल मुरक्या, नंदू तिवारी, सोमनाथ दायमा, मोहनलाल अग्रवाल, मनोज कासट, राधेश्याम बियाणी, रतनलाल मुरक्या, महेश भांगडिया, नंदकुमार साबू, भूषण कासट, श्रीनिवास लखोटिया, प्रेमगोपाल कासट, मनोज राठी, गोपाल बियाणी, रविंद्र चोकडा, अमोल काला, लक्ष्मीकांत लखोटिया, गोविंद भारतीय, सोनू अग्रवाल, गुड्डू दायमा, अजय तायल, संतोष साबू, गिरीश मुरक्या, राजूसेठ भुतडा, गोविंद होलानी, उमेश दायमा, श्रीकांत मणियार, डॉ. हरिकिशन शर्मा, डॉ. नितीन मानधने, डॉ. मनोज अग्रवाल, डॉ. जीवन मुरक्या, डॉ. कुलदीप शर्मा, डॉ. सागर झंवर, पप्पू दायमा, सुधीर अग्रवाल, सचिन मणियार, भूषण गिल्डा, यश तिवारी, गोपाल दायमा यांच्यासह सर्व राजस्थानी समाज बांधवांनी शुभेच्छा दिल्या.तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून सुनील चंपालालजी राठी, सतीश कासट, रुपेश लखोटिया, अनिल तोष्णीवाल, योगेश मणियार, दिलीप मणियार, जयप्रकाश सोमाणी आणि संदीप मणियार यांचा समावेश करण्यात आला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी सर्व पदाधिकारी एकत्रितपणे कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महिलांना समान संधी समान हक्क देणारे महात्मा बसवेश्वर हे महिला आरक्षणाचे खरे प्रेरणास्त्रोत : आ.मोनिका राजळे

पाथर्डी । प्रतिनिधी

बाराव्या शतकात म्हणजेच अशा कालखंडात की ज्या वेळी स्त्री चूल आणि मुल या संकल्पनेच्या बाहेर जाऊ दिले जात नव्हते अशा कालखंडात महात्मा बसवेश्वर महाराजांनी स्त्रियांना धार्मिक कार्यासह राज्यकारभारात आरक्षण दिले संसदेमध्ये नारी शक्ती बिल संमत होऊ दिले गेले नाही वस्तुतः हे बिल संमत झाले असते तर महात्मा बसवेश्वरांना हीच खरी मानवंदना ठरली असती असे प्रतिपादन आ.मोनिका राजळे यांनी केले.

पाथर्डी शहरातील वसंतराव नाईक ते



उपजिल्हा रुग्णालय मार्गाला महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण आ.मोनिका राजळे नगराध्यक्ष अभय आव्हाड उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे सीईओ संतोष लांडगे नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर यांचे हस्ते करण्यात आले त्यानंतर नगरपरिषद प्रशासनाचे वतीने महात्मा बसवेश्वर यांना मानवंदना देण्यात आली यावेळी बोलताना आ.मोनिका राजळे यांनी सांगितले की बाराव्या शतकात वर्ण वंश उच्च निच भेदभाव व स्त्री पुरुष असमानता पराकोटीला पोहोचली असताना प्रवाहाच्या विरोधात जाऊन समानतेचे राज्य प्रस्थापित करणारे महात्मा बसवेश्वर महाराज यांचे कार्य आज खऱ्या अर्थाने आदर्शवत ठरत आहे असे सांगितले लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी प्रास्ताविकात महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला उजाळा दिला याप्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके सुभाष बोरुडे अमोल गर्जे ॲड प्रतिक खेडकर बंडू बोरुडे प्रतिक नागरे जगदीश मुने संजय देशमुख मनिषा उदमले संदीप पवार अजिनाथ मोरे पुरुषोत्तम इजारे रेणुका फुलशेटे अभिजित गुजर दयानंद जिरेसाळ संजय पैठणकर दत्तात्रय टेंभुरकर गजानन तारापुरे सचिन फुटाणे प्रथमेश नाकील संतोष बुरसे,चंदनकर जगदीश नरे सचिन साखरे संतोष मेगुंडे संजय होनमुने शुभम इजारे तन्मय फुटाणे हुमायून आतार आदींसह समाजबांधव उपस्थित होते आभार पुरुषोत्तम इजारे यांनी मानले.

## ७ लाखाचं झेंडू फुलाचे बियाणे चोरी प्रकरणी आरोपीला जामीन

जालना। प्रतिनिधी

१८ एप्रिल रोजी लोकेश देवेद्रअप्पा इलेगर, जि.नामांकित सिड्स कंपनीचा प्रोडक्शन मॅनेजर असल्याचे बतावणी करुन कर्नाटकातील शेतकऱ्याच्या बियाण्यांची जबरी चोरी करणारे दोन आरोपी अटक केले होते परंतु सदरील आरोपीला न्यायालयामध्ये हजर केले असता त्या आरोपीला न्यायालयाने जामीन मंजूर केली आहे अशी माहिती सदर बाजार पोलीस स्टेशन पोलिसांकडून दिली आहे. रु.२१,३८,८००/- किंमतीचा मुददेमाल केला जप्त स्थानिक गुन्हे शाखेनेने कारवाई केली फिर्यादी लोकेश देवेद्रअप्पा इलेगर, सेंट मेरी हायस्कुल समोर, जालना येथे दोन अनोळखी इसमांनी झेंडुचे बियाणे विकत घेण्याच्या बहाण्याने जालना येथे बोलावुन आरोपी हे नामांकित सिडस कंपनीमध्ये प्रोडक्शन मॅनेजर असल्याची बातवणी करुन फिर्यादीच्या ताब्यातील १७ किलो ७०० ग्रॅम वजनाचे रु.७,७८,८००/- किंमतीचे झेंडु फुलाचे बियाणे घेवुन दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस मोटार सायकलवर बसवुन थोड्या अंतरावर घेवुन जावुन त्यास मोटार सायकलवरुन धक्का देवुन खाली पाडुन फिर्यादीच्या बियाण्यांची जबरी चोरी केल्याने फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाणे, जालना गु.र.क्र.२८५/२०२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्यां.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदर जबरी चोरीचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक



श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते. दिनांक १८/०४/२०२६ रोजी सदर गुन्हयातील आरोपीतांची माहिती घेवुन मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना गुन्हयातील आरोपी हे एका काळया रंगाच्या बोलेरो कारमध्ये देऊळगांव राजा कडुन जालना च्या दिशेने येत असल्याचे गुप्त बातमीदारामार्फत कळाल्याने माहितीच्या आधारे कन्हैय्यानगर, जालना येथे सापळा रचुन गुन्हयातील दोन्हीही आरोपीतांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे सुनिल बाबासाहेब जगताप, वय १९ वर्ष, व्यवसाय-व्यापार बियाणे खरेदी विक्री, रा. निवडुंगा, ता. जाफ्राबाद, जि.जालना व २) वैभव पांडुरंग जगताप, वय-२३ वर्ष, व्यवसाय-व्यापार बियाणे खरेदी विक्री, रा.निवडुंगा, ता. जाफ्राबाद, जि. जालना असे सांगितले. त्यानंतर त्यांना गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवुन गुन्हयातील जबरी चोरी केलेले झेंडु फुलाचे १७ किलो ७०० ग्रॅम बियाणे, गुन्हयात वापरलेली बोलेरो कार, आरोपीतांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेले मोबाईल असा एकुण रु.२१,३८,८००/- किंमतीचा मुददेमाल आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सागर बाविस्कर, इरशाद पटेल, देविदास भोजने, आक्रूर धांडगे, सौरभ मुळे सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे. हावेरी राज्य कर्नाटक सेंट मेरी हायस्कुल समोर, जालना येथे दोन अनोळखी इसमांनी झेंडुचे बियाणे विकत घेण्याच्या बहाण्याने जालना येथे बोलावुन आरोपी हे नामांकित सिडस कंपनीमध्ये प्रोडक्शन मॅनेजर असल्याची बातवणी करुन फिर्यादीच्या ताब्यातील १७ किलो ७०० ग्रॅम वजनाचे रु.७,७८,८००/- किंमतीचे झेंडु फुलाचे बियाणे घेवुन दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस मोटार सायकलवर बसवुन थोड्या अंतरावर घेवुन जावुन त्यास मोटार सायकलवरुन धक्का देवुन खाली पाडुन फिर्यादीच्या बियाण्यांची जबरी चोरी केल्याने फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाणे, जालना गु.र.क्र.२८५/२०२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्यां.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही -मंत्री संजय शिरसाट

### बुद्ध-आंबेडकर-रमाई मूर्तींचे अनावरण



अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीलासुरा येथे आज सिद्धार्थ बौद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट होते, तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार नारायणराव कुचे उपस्थित होते. पूज्य भंते राजरत्न थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली विधिवत पूजा करून मान्यवरांच्या हस्ते मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व, सामाजिक समता व शिक्षणाचे मूल्य सांगत, मंत्री संजय शिरसाट म्हणाले,महाराष्ट्रात विविध ठिकाणी सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध विकासाची कामे जोमाने सुरू आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्पित कार्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, याची मी ग्वाही देतो. आमदार नारायण कुचे म्हणाले की, वडीलासुरा येथे उभारण्यात आलेल्या स्मारकाच्या माध्यमातून समता, बंधुता व न्यायाचे विचार समाजात अधिक दृढ होण्यास मदत होईल. तसेच भावी पिढीला प्रेरणा मिळेल.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र



# जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर!

## जिल्हा दुष्काळाच्या उंबरठ्यावर तरीही तलावातून अवैध पाणी उपसा सुरूच; पाणीटंचाईचे संकट गडद

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील भायाळा साठवण तलावातून सुरू असलेल्या अवैध पाणी उपश्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशानंतरही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याचे समोर आले आहे.

जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी पिण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडू नये यासाठी जिल्ह्यातील लघु व मध्यम प्रकल्पांमधून होणारा नियमबाह्य पाणी उपसा तत्काळ थांबवण्याचे आदेश महसूल व पाटबंधारे विभागाला दिले होते. मात्र, या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, भायाळा तलावावर अवलंबून असलेल्या भायाळा, वाघिरा, मेंगडेवाडी, लिंबागणेश, पोखरी (घाट), पिंपरनई, बेलगाव (सोमनाथवाडी) आदी गावांमध्ये पाणीटंचाईचे सावट गडद होत चालले आहे. शेतातील विहिरी, सार्वजनिक पाणीपुरवठा योजना आणि विंधन विहिरी कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत.

कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन मग्न – डॉ. ढवळे

अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी नेमण्यात आलेले पथक निष्क्रिय असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. प्रशासन केवळ कागदोपत्री कारवाई करत असून



प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याची टीका त्यांनी केली आहे.

तलावातील पाणी साठा संरक्षित ठेवण्याची मागणी

शासनाच्या नियमानुसार तलावातील ६७ टक्के पाणीच सिंचनासाठी वापरण्याची परवानगी असून उर्वरित ३३ टक्के पाणी मानव, जनावरे व वन्यजीवांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन होत असल्याने भविष्यात गंभीर पाणीबाणी निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. डॉ. ढवळे यांनी तलावातील पाणीसाठा संरक्षित ठेवावा तसेच कामचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जिल्ह्यात पाणीसाठा झपाट्याने घटतोय

वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला असून जिल्ह्यातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणी शिल्लक आहे. तसेच १२६ लघु प्रकल्पांपैकी १२ प्रकल्प जोत्याखाली गेले असून २१ प्रकल्पांमध्ये ५० टक्केच पाणी आहे. शासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील १४३ धरणांमध्ये सध्या १९८.७१२ दशलक्ष घनमीटर पाणी मृतसाठ्यात आहे, तर ३० धरणांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे.

दुष्काळाची शक्यता वाढली

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. यावर्षी अल निनो च्या प्रभावामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे तातडीने उपाययोजना न केल्यास ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये 'नारी शक्ती' जागरूकता सत्र

बीड । प्रतिनिधी

स्थानिक 'तुलसी फॅशन डिझाईन कॉलेज' येथे 'नारी शक्ती कौशल्य अभियान आणि जागरूकता सत्र' अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाला परिसरातील महिला, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा उदंड प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ड. आदर्श अरुणराव जाधव उपस्थित होते.

या सत्राच्या वेळी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्य अश्विनी बेद्रे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.



ॲड. आदर्श जाधव यांचे विद्यार्थिनींना सक्षमीकरणाचे आवाहन; महिला आरक्षण विधेयकावर सविस्तर चर्चा

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली.

आरक्षण ही संधी, तर शिक्षण हे शस्त्र:

यावेळी विद्यार्थिनींशी संवाद साधताना ड. आदर्श जाधव यांनी महिलांच्या राजकीय, सामाजिक आणि कायदेशीर हक्कांवर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना जे समतेचे अधिकार दिले, त्याच स्वप्नाला 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (महिला आरक्षण विधेयक) पूर्णत्वास नेणारे आहे. महिलांनी केवळ 'मतदार' न राहता 'निर्णय घेणाऱ्या' नेतृत्वाच्या भूमिकेत समोर येणे ही काळाची गरज आहे.

विविध विषयांवर मार्गदर्शन:

या सत्रात राजकीय आरक्षणासोबतच महिलांचे आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन ◀◀ पान ३ वर

## आष्टी नगरपंचायतचे अभियंता अथहर बेग पवित्र हज यात्रेसाठी रवाना

आष्टी । प्रतिनिधी

येथील नगरपंचायत कार्यालयात कार्यरत असलेले नगर अभियंता मिर्झा अथहर इनायतुल्ला बेग हे पवित्र हज यात्रेसाठी काल रवाना झाले. सुमारे ४५ दिवसांच्या या यात्रेदरम्यान ते इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र तीर्थस्थळे असलेल्या मक्का आणि मदीना येथे जाऊन धार्मिक विधी पार पाडणार आहेत.

हज यात्रा ही इस्लाम धर्मातील पाचवा स्तंभ मानली जाते. शारीरिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या प्रत्येक मुस्लिमाने आयुष्यात किमान एकदा हज करणे आवश्यक मानले जाते. इस्लामी दिनदर्शिकेनुसार जिलहज्ज



महिन्यात ही यात्रा पार पडते आणि जगभरातील लाखो मुस्लिम सौदी अरेबिया येथे एकत्र येऊन श्रद्धाभावाने हज करतात. हज यात्रेमध्ये ◀◀ पान ३ वर

## तालुका पत्रकार संघाकडून आजबे कुटुंबियांचे सांत्वन, शिराळ येथे जाऊन पत्रकारांनी वाहिली श्रद्धांजली

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक आणि आष्ट,पाटोद-शिरूर मतदार संघाचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांचे ज्येष्ठ बंधू विलास आबा आजबे यांच्या दुःखद निधनाने संपूर्ण तालुक्यात आणि सहकार क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे.आजबे कुटुंबियांना आधार देण्यासाठी आणि त्यांचे सांत्वन करण्यासाठी आष्टी तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांनी नुकतीच शिराळ येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट दिली.विलास आबा आजबे यांनी बीड जिल्हा बँकेचे संचालक म्हणून काम करताना सहकार क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला होता. त्यांचा जनसंपर्क आणि सामाजिक कार्यातील सहभाग मोठा होता.त्यांच्या अचानक जाण्याने आजबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद घटनेची माहिती मिळताच आष्टी तालुक्यातील माध्यम प्रतिनिधींनी शिराळ गावी जाऊन कुटुंबाचे सांत्वन केले.

यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप,ज्येष्ठ पत्रकार भीमराव गुरव,शरद तळेकर,शरद रेडेकर,गणेश दळवी,मनोज पोकळे,सचिन रानडे यांनी माजी आमदार बाळासाहेब आजबे व त्यांच्या शोककुल कुटुंबियांची भेट घेतली.उपस्थित पत्रकारांनी विलास आबा यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण केले. विलास आबांच्या जाण्याने केवळ आजबे कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण तालुक्याची आणि सहकार क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. या दुःखाच्या प्रसंगात आष्टी तालुका पत्रकार संघ आपल्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशा भावना पत्रकारांनी व्यक्त केल्या.या सांत्वनपर भेटीदरम्यान विलास आबा आजबे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिराळ ग्रामस्थ आणि इतर मान्यवर देखील उपस्थित होते.



## ह.भ.प.ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचा परिवर्तनवादी कीर्तनाचा कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची २९ एप्रिल रोजी जयंती आयोजित केली असून या जयंतीनिमित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे संध्याकाळी ठीक ७.३० वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध परिवर्तनवादी शिक्षणाचे महत्व पटवून देणारे,समतावादी विचार मांडणारे कीर्तनकार शिव, फुले, शाहू, आंबेडकरांचे पाईक ह. भ. प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचा कार्यक्रम जयंती समितीकडून ठेवण्यात आला आहे तरी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समिती व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

## महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप

शिरूर कासार । प्रतिनिधी

स्त्री शिक्षणाचे आद्य जनक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि.१७) शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथील जिल्हापरिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत स्त्री शिक्षणाचे आद्य जनक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त ५० लेझीम,एक मोठा ढोल,एक ताशा,एक झाँज,एक पिपाणी असे शाळेसाठी उपयुक्त असणारे वाद्ये,शालेय साहित्य शुक्रवार (दि.१७) रोजी शाळेला भेट देण्यात आले.जयंतीच्या वर्गणीतून जमा झालेल्या रकमेतुन हे शालेय साहित्य खरेदी करण्यात आले.एक चांगला उपक्रम हाती घेतल्याचे शिक्षकांनी जयंती उत्सव समितीचे आभार मानत कौतुक केले.यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष धर्मराज दुधाळ,उपाध्यक्ष अनिकेत सानप,अमोल दुधाळ,सिद्धेश्वर दुधाळ, बालाजी गवळी,दीपक,दुधाळ,सोमेश टाकसाळ,मुकुंद वाकळे,रामकिसन दुधाळ,रवी दुधाळ,गणेश मुळे,शाम दुधाळ,अशोक देवकर तसेच शाळेतील शिक्षक दुधाळ दत्तात्रय, घोरड अतुल, मिसाळ अरुण, कदम संदीप, शिक्षिका बडवे कविता, खेत्रे सावित्रा, राख वर्षा, जेधे सुशीला यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुस्लिम एल्गार महामोर्चासाठी हजारो मुस्लिम बांधवांना ॲड. आनंद काळे यांच्याकडून पाणी व मठ्ठ्याचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

बीड येथे दि. १७एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम आरक्षण एल्गार महामोर्चासाठी जिल्ह्यातील विविध भागांतून हजारो मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. उन्हाच्या तीव्रतेमुळे आणि लांबून आलेल्या मुस्लिम बांधवांची गैरसोयीचा विचार करून वडवणी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते ड. आनंद भैय्या काळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत या बांधवांसाठी थंडगार पाणी व मठ्ठ्याची उत्कृष्ट व्यवस्था केली.



महामोर्चाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या या पाणी व मठ्ठा वितरण केंद्रावर दिवसभर सतत सेवा सुरू होती. मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेल्या मुस्लिम बांधवांनी या सुविधेचा लाभ घेतला. विशेषतः कडक उन्हात ही सेवा अत्यंत दिलासा देणारी ठरली. स्वयंसेवकांच्या मदतीने शिस्तबद्ध पद्धतीने वितरण करण्यात आले. ॲड. आनंद काळे यांनी यावेळी सांगितले की, समाजातील कोणत्याही घटकासाठी काम करणे ही आपली जबाबदारी आहे. मानवतेच्या नात्याने गरजूंना मदत करणे हेच खरे सामाजिक कार्य आहे. त्यांच्या या उपक्रमातून सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा संदेश दिला गेला. या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, उपस्थित नागरिकांनी आणि मुस्लिम बांधवांनी ड आनंद काळे यांचे आभार मानले. सामाजिक भान जपत अशा प्रकारचे उपक्रम राबवणाऱ्या तरुण नेतृत्वाची परिसरात प्रशंसा व्यक्त केली जात आहे.

## बालाजी मंदिरात 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बालाजी मंदिरामध्ये माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने लहान मुलांसाठी १० दिवसीय 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात पार पडला. न कोई पहला, न कोई आखिरी, हर चमक है जरूरी या अभिनव संकल्पनेवर आधारित या शिबिरात स्पर्धाविरहित वातावरण ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक मुलाला मोकळेपणाने आपली कला, कल्पकता आणि सहभाग व्यक्त करण्याची संधी मिळाली.

या समरकँपचे आयोजन मंडळाच्या अध्यक्षा अलकनंदा



मानधने, सचिव अनिता मुंदडा, कोषाध्यक्ष सुरेखा जेथलीया, सहसचिव सुगना तेला, सहकोशाध्यक्ष किरण कासट व संघटन मंत्री रत्नमाला इंदाणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

दररोजच्या सत्राची सुरुवात श्लोक व प्रार्थनेने होत होती. रत्नमाला इंदाणी यांनी विविध गाण्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, आरोग्यदायी आहार, प्लास्टिकमुक्ती, जगा आणि जगू द्या यांसारख्या मूल्यांवर मुलांना मार्गदर्शन केले. डॉ.सौ.राधिका बजाज व सौ.अनिता लोहिया यांनी ध्यान, योग व झुंबा नृत्याचे प्रशिक्षण दिले. कुमारी मानसी मानधने यांनी आर्ट अँड क्राफ्टचे मार्गदर्शन केले, तर प्रियंका भुतडा, अंकिता भुतडा, जयश्री लड्डा, सुप्रिया मालानी व सेजल मुंदडा यांनी बोधकथा व विविध खेळांद्वारे मुलांचे मनोरंजन व शिक्षण केले. सौ.भाग्यश्री करवा यांनी गमतीशीर विज्ञान प्रयोग सादर करून मुलांमध्ये ◀◀ पान ३ वर

## महिला आरक्षणाला विरोध करुन काँग्रेसने महिलांच्या हक्कांवर आघात केला : सचिन मुळूक

### महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध : संगीताताई ठोंबरे

केज । प्रतिनिधी

महिलांना राजकारणात समान संधी मिळावी, त्यांचे प्रतिनिधित्व वाढावे आणि त्यांचा आवाज सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचावा यासाठी केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर केले. मात्र काँग्रेसने विधेयकाला विरोध करुन महिलांच्या हक्कांवर आघात केला तर महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध असल्याचे माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा निषेध करण्यासाठी केज येथे भवानी चौकात शनिवारी




(दि.१८)शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात शिवसैनिकांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. यावेळी सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले की, केंद्राच्या महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेसने याला विरोध करून महिलांच्या प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा भूमिकेला जनता कधीही स्वीकारणार नाही आणि योग्य वेळी त्यांना याचे उत्तर दिले जाईल असा इशारा मुळूक यांनी दिला. या वेळी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनीही काँग्रेसच्या भूमिकेवर सडकून टीका केली. महिला आरक्षण विधेयक हे महिलांच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक असून, त्याला विरोध करणाऱ्यांविरोधात शिवसेना रस्त्यावर उतरून लढा देत राहील, असा इशाराही त्यांनी दिला.या आंदोलनात महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, शितलताई सोनवणे, मुक्ताताई गडमवार, ज्ञानेश्वरी ताई सांगळे, ज्येष्ठ शिवसैनिक अशोक जोगदंड, डॉक्टर संतोष बुडुक, तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख ◀◀ पान ३ वर

## दानशूरांच्या पुढाकारातून श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिर उभारणीला वेग

### निंबाळकर व मटाले यांची लाखोंची देणगी

आष्टी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे सुरू असलेल्या मंदिर नवनिर्माणाच्या पवित्र कार्याला सध्या चांगलीच गती मिळत असून या उपक्रमासाठी विविध स्तरांतून सहकार्याचा ओघ वाढत आहे.

भाविक व दानशूर व्यक्तींच्या पुढाकारामुळे मंदिर उभारणीचे काम अधिक वेगाने मार्गी लागत आहे.

या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील आष्टा ह.ना.गटाचे



जि. प.सदस्य अमरराजे रावसाहेब निंबाळकर यांनी १,०१,०००/– रुपयांची उदार देणगी देवस्थान गडाचे विश्वस्त आमदार सुरेश धस यांच्या हस्ते दिली. तसेच पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नाथभक्त वैशाली मोहन मटाले यांनीही १,००,०००/– रुपयांचा धनादेश गडाचे विश्वस्त आ. सुरेश धस यांच्या हस्ते देवस्थान समितीकडे सुपूर्द केला. या देणगीमुळे मंदिर उभारणीच्या कार्याला अधिक बळ मिळणार आहे. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# खळबळजनक! मुठा नदीपात्रात अज्ञात तरुणाचा मृतदेह सापडला, घातपाताचा संशय

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. पुण्यातील मुठा नदीच्या पात्रात एका अज्ञात तरुणाचा मृतदेह सापडला आहे. प्राथमिक माहितीनुसार, दगडाने ठेचून या तरुणाचा खून केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी दाखल होऊन पुढील कारवाई करत आहे. यात तरुणावर हत्या झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून तरुणाची ओळख पटवण्याचा काम सध्या पुणे पोलिसांकडून सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पुणे महापालिकेच्या समोर असलेल्या नदी पात्रात हा मृतदेह सापडलाय. जवळच मेट्रो स्टेशन आणि शिवाजी नगरकडून शनिवार वाड्याकडे जाणारा पुल आहे. अशा वर्दळीच्या ठिकाणी हा मृतदेह सापडलाय. प्राथमिक माहितीनुसार, तरुणाच्या शरीरावरील जखमा लक्ष्यात घेता दगडाने ठेचून या तरुणाचा खून केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून सध्या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहे.

वाढदिवस साजरा करत असताना दुचाकीचा धक्का लागला, या कारणावरून परभणीच्या पूर्णा तालुक्यातील गौर गावात जोरदार राडा झाल्याची घटना घडलीय. तर या मारहाणीत एक जण गंभीर जखमी झाला असून जमावाने गावातील चारचाकी गाडी जाळली आहे. दरम्यान गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गौर गावातील सुशील पारवे आणि गोरखनाथ पारवे हे गावात जात असताना रस्त्यातच दुचाकी लावून सुजित सावळे वाढदिवस साजरा करत होते. यावेळी सुशील पारवे आणि गोरखनाथ पारवे यांचा त्यांच्या दुचाकीला धक्का लागला. त्यामुळे व जुन्या वादातून सुजित सावळे आणि संतोष सावळे यांनी गोरखनाथ पारवे यांना कत्तीने मारहाण केली. ज्यात ते गंभीर जखमी झाले यानंतर एका जमावाने गावातील बालाजी सावळे यांच्या घरासमोर लावलेली चारचाकी वाहन जाळली. ज्यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता तत्काळ पोलीस गावात पोचले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणात गोरखनाथ पारवे यांना कत्तीने मारहाण केल्या प्रकरणी ५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर चारचाकी वाहन जाळल्याच्या प्रकरणात एकूण १५ जणावर गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त गावात तैनात करण्यात आला आहे.

# हवाई दलाच्या विमानाचा लँडिंगवेळी बिघाड पुणे विमानतळावर मोठा अनर्थ टळला

पुणे । प्रतिनिधी

येथे शुक्रवारी (दि.१७) उशिरा रात्री भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाला असल्याची घटना घडली आहे. लँडिंगदरम्यान विमानाचे लँडिंग गिअर निकामी झाल्यामुळे ही घटना घडली असल्याची माहिती मिळत आहे.



सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि विमानातील सर्व कर्मचारी सुरक्षित असल्याची माहिती आहे. तसेच नागरी मालमत्तेचेही कोणतेही नुकसान झालेले नाही.

अपघातानंतर सुरक्षिततेच्या कारणास्तव विमानतळाची धावपट्टी तात्पुरती बंद करण्यात आली होती. हवाई वाहतूक नियंत्रण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धावपट्टी मोकळी करून पूर्वस्थितीत आणण्यासाठी सुमारे ४ ते ५ तासांचा कालावधी लागला.

दरम्यान, दुरुस्तीचे काम वेगाने पूर्ण करण्यात आले असून शनिवारी सकाळी साडेसात वाजल्यापासून उड्डाणे पुन्हा सुरू झाली आहेत. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या सूचनेनुसार दुरुस्तीचे काम जलदगतीने पूर्ण करण्यात आले.दरम्यान, या घटनेनंतर फ्लाइट रडार २४ च्या फ्लाइट ट्रॅकिंग डेटानुसार, पुणे विमानतळावर उतरणारी किमान आठ विमाने सुरत आंतरराष्ट्रीय विमानतळ, गोवा मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कोईम्बतूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर वळवण्यात आली. रात्री ११.४१ वाजता भारतीय हवाई दलाच्या माध्यम समन्वय केंद्राने एका पोस्टमध्ये सांगितले की, या घटनेमुळे धावपट्टी अनुपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, विमानातील सर्व कर्मचारी सुरक्षित असून कोणतीही नागरी मालमत्ता खराब झालेली नाही.

# ‘लेक लाडकी’ योजनेतून पुण्यात ९,४८२ मुलींना ४.७४ कोटींचा लाभ

पुणे: राज्यातील मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरू केलेल्या ‘लेक लाडकी योजने’अंतर्गत जिल्ह्यात १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या ९ हजार ४८२ मुलींना मागील तीन वर्षांत ४ कोटी ७४ लाख १० हजार रुपये लाभ देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे. तसेच, या योजनेचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.




पहिला हप्ता प्रतिलाभार्थी ५ हजार रुपयाप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १ हजार ४० मुलींना ७० लाख रुपये, सन २०२४-२५ मध्ये ५ हजार ७२० मुलींना २ कोटी ८६ लाख रुपये आणि सन २०२५-२६ मध्ये २ हजार ३६२ मुलींना १ कोटी १८ लाख १० हजार रुपयांचा लाभ देण्यात आलेला आहे. मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढवणे, मुलींच्या शिक्षणाला चालना देणे, मुलीचा मृत्युदर कमी करणे, बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ‘लेक लाडकी योजना’ सुरू करण्यात आली आहे.

मुलीच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, इयत्ता सातवीत ७ हजार, इयत्ता अकरावीत ८ हजार, मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये, असे मिळून १ लाख १ हजार रुपयांचा लाभ देण्यात येतो. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील, बालकल्याण सभापती अंकिता पाटील यांनी जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण संतुलित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासोबतच महिला सक्षमीकरणाकरिता प्रभावी योजनांची आखणी करून अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

# पुणे विद्यापीठाची SET परीक्षा वेळेतच; डॉ. प्रभाकर देसाई समन्वयकपदी

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागातर्फे घेण्यात येणारी यंदाची सेट परीक्षा नियोजित वेळेनुसारच घेण्यासाठी विद्यापीठाने पावले उचलली आहेत. एकीकडे परीक्षेची तयारी सुरू केली असताना दुसरीकडे सेट विभागाच्या समन्वयकपदी डॉ. प्रभाकर देसाई यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते सोमवारी पदभार घेणार आहेत. त्यामुळे सेट परीक्षा नियोजित वेळेतच होणार असल्याची माहिती विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.



राज्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत सुमारे पाच हजार ५०० प्राध्यापक पदांची भरती प्रक्रिया सुरू असून, सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास पात्र उमेदवारांना या भरतीत सहभागी होता येणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र आणि गोवा राज्यांसाठी नोडल एजन्सी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून परीक्षेचे वेळापत्रक तातडीने जाहीर करण्यात यावे, अशी मागणी सेट परीक्षेसाठी इच्छुक उमेदवारांनी केली आहे.

डॉ. प्रभाकर देसाई सोमवारी स्वीकारणार पदभार

सेट विभागात महिनाभरापूर्वीच विभागप्रमुख म्हणून पदभार स्वीकारलेल्या डॉ. अविनाश कुंभार यांनी नुकताच राजीनामा दिला. त्यामुळे विभागाला समन्वयकच नव्हते. परंतु आता परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचा परीक्षा विभागाचा पदभार संपुष्टात आला आहे, तसेच त्यांची सेट विभागाच्या समन्वयकपदी नेमणूक करण्यात आली आहे. सोमवारी डॉ. देसाई पदभार स्वीकारणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सेट परीक्षेसाठी नवीन सेट समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून, परीक्षेची तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे परीक्षा नियोजित वेळेतच पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

डॉ. प्रफुल्ल पवार, प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# नारायणगाव बाह्यवळणावर ट्रकची धडक; ७ मेंढ्या ठार, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

नारायणगाव: पुणे-नाशिक महामार्गावरील बाह्यवळण रस्त्यावर ट्रकच्या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे ठार झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या अपघातात दोन शेळ्या गंभीर जखमी झाल्या असून मेंढपाळ तुकाराम निंबारकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, निंबारकर यांची शेती बाह्यवळण रस्त्याच्या पश्चिम बाजूस असून सध्या त्यांच्या शेतात कांदा काढणीचे काम सुरू आहे. कांदा काढणीनंतर उरलेल्या कांद्याच्या पातीवर चरण्यासाठी ते दुपारी मेंढ्या व शेळ्या घेऊन शेतात गेले होते. सायंकाळी साडेसात ते पावणेआठच्या सुमारास परतत असताना भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याने मेंढ्या व शेळ्या घाबरून रस्त्याकडे पळाल्या. दरम्यान, आळेफाटा बाजूकडून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक चालकाला अंधारामुळे कळपाचा अंदाज आला नाही आणि ट्रकची जोरदार धडक बसली. या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे जागीच ठार झाली, यामुळे तुकाराम निंबाळकर यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. पोलिसांनी ट्रक चालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी या शेतकऱ्याची आहे.

एवढे मोठे नुकसान झाल्यामुळे तुकाराम निंबारकर यांना मानसिक धक्का बसला आहे. या रस्त्यावर असलेले पथदिवे बंद असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या बाह्यवळण रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याबाबत आठ दिवसांपूर्वीच बाजार समितीचे माजी संचालक विपुल फुलसुंदर यांनी दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात घडल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे. वेळीच पथदिवे सुरू केले असते तर ही दुर्घटना टळली असती, अशी भावना निंबारकर यांनी व्यक्त केली असून प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# झेड ब्रिज परिसरात ३२ वर्षीय तरुणाचा गळा चिरून खून

पुणे । प्रतिनिधी

मुठा नदीपात्रात झेड ब्रिज परिसरात ३२ वर्षीय तरुणाचा गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. १९) सकाळी उघडकीस आली. मुठा नदी परिसरातील या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

डेक्कन परिसरात घडलेल्या या प्रकरणी डेक्कन पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषल कसबे ( ३२, रा. धनकवडी) असे मृत तरुणाचे नाव असून, पोलिस अंमलदार आकाश सोनवणे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सुमारे साडेसात वाजण्याच्या सुमारास झेड ब्रिज आणि लकडी पूल दरम्यानच्या नदीपात्रात एका तरुणाचा मृतदेह आढळून आला.अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने गळ्यावर वार केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. आरोपी अद्याप फरार असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध पथके कार्यरत करण्यात आली आहेत.या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पुण्यात ९ हजार ‘लेकी’ झाल्या लाडक्या! सरकारी तिजोरीतून ४ कोटी ७४ लाख थेट खात्यात

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या ‘लेक लाडकी’ योजनेची पुणे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होत आहे. १ एप्रिल २०२३ नंतर जन्म झालेल्या जिल्ह्यातील तब्बल ९ हजार ४८२ मुलींना आतापर्यंत ४ कोटी ७४ लाख १० हजार रुपयांचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे.

मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देणे, शिक्षणाला चालना देणे, बालविवाह रोखणे आणि कुपोषण कमी करण्याच्या उद्देशाने ही योजना राबवली जात आहे. पुणे जिल्हा परिषदेने दिलेल्या आकडेवारीनुसार, योजनेच्या पहिल्या हप्त्यापोटी (प्रतिलाभार्थी ५ हजार रुपये) २०२३-२४ मध्ये १ हजार ४० मुलींना ७० लाख रुपये, २०२४-२५ मध्ये ५ हजार ७२० मुलींना २ कोटी ८६ लाख रुपये, तर २०२५-२६ या वर्षात आतापर्यंत २ हजार ३६२ मुलींना १ कोटी १८ लाख १० हजार रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

या योजनेचे स्वरूप अत्यंत कल्पक असून, मुलीच्या जन्मापासून ती सज्ञान होईपर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण १ लाख १ हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाते. यात जन्मानंतर ५ हजार, पहिलीत गेल्यानंतर ६ हजार, सातवीत ७ हजार, अकरावीत ८ हजार आणि मुलगी १८ वर्षांची झाल्यावर तिला ७५ हजार रुपये मिळतात.

पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबातील १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुली या योजनेसाठी पात्र आहेत, अट केवळ कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी असण्याची आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील आणि बालकल्याण सभापती अंकिता पाटील यांनी जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण संतुलित राखण्यासाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन झेडपीच्या महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी आनंद खंडागळे यांनी केले आहे.

# ‘छोटा वारकरी’ने मारली बाजी! महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेचा जागतिक गौरव

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि २१ व्या शतकातील प्रगत 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (-I) यांचा एक अभूतपूर्व संगम सध्या तंत्रज्ञान विश्वात चर्चेचा विषय ठरत आहे. या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी पुण्याच्या वारीव्हर्स स्टुडिओज (Vaariverse Studios) या स्टार्टअपने 'मास्टर्स युनियन नेक्स्ट टेक १.० एआय शिखर परिषद २०२६' मध्ये मानाचा 'ऊीशरींळींश -I Luminary -ward 2026' पटकावला आहे.

परंपरा आणि तंत्रज्ञानाचा सुवर्णसंगम

वारीव्हर्स स्टुडिओजचे संस्थापक स्वप्नील मोरे आणि सह-संस्थापक पूजा मोरे यांना या जागतिक स्तरावरील व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले. या स्टार्टअपच्या छोटा वारकरी या उपक्रमाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. शतकानुशतके चालत आलेली अभंगवाणी, संतांचे विचार आणि वारकरी संस्कार नव्या पिढीला समजेल अशा रंजक भाषेत मांडण्यासाठी त्यांनी -ख तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले छोटा वारकरीचे अनावरण!

काही दिवसाआधी महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि संतांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी एका आधुनिक उपक्रमाचा श्रीगणेशा झाला होता. राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी छोटा वारकरी या अभिनव निमेशन कॅरेक्टरचे अधिकृत उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले.

संस्थापकांच्या भावना

या यशाबद्दल बोलताना संस्थापक स्वप्नील मोरे म्हणाले, हा सन्मान केवळ आमचा नसून संपूर्ण वारकरी परंपरेचा आहे. 'याचा धरीन अभिमान, करीन आपुले जतन' या उक्तीप्रमाणे, आमची संस्कृती जागतिक स्तरावर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. -ख हे केवळ साधन नसून ते भविष्यातील संवादाचे सशक्त माध्यम आहे. सह-संस्थापक पूजा मोरे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, छोटा वारकरी हा आमच्यासाठी केवळ एक प्रोजेक्ट नसून तो एक भावनिक प्रवास आहे. या पुरस्कारामुळे आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

स्टार्टअप इंडियाची साथ

मीडिया आणि एंटरटेनमेंट क्षेत्रात कार्यरत असलेल्या वारीव्हर्स स्टुडिओजला भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत मान्यता मिळाली आहे. भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर हे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या पुरस्कारामुळे केवळ महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा डंका जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात वाजला आहे. पारंपारिक भक्ती मार्ग आता डिजिटल युगात 'स्मार्ट' पद्धतीने प्रवाहित होत आहे, हेच या यशाने सिद्ध केले आहे.

काय आहे छोटा वारकरी संकल्पना?

गेल्या १५ वर्षांपासून 'फेसबुक दिंडी' (ऋलशलेज्ञ ऊळपवळ) व 'व्हर्च्युअल दिंडी'च्या माध्यमातून वारीचा प्रचार करणारे स्वप्नील मोरे यांनी या संकल्पनेची निर्मिती केली आहे. याच पिढीला आपल्या मुळांशी जोडण्यासाठी 'छोटा वारकरी' या पात्राची निर्मिती करण्यात आली आहे. -ख आधारित कथाकथन , ॲनिमेशन आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून लहान मुलांवर आध्यात्मिक व नैतिक संस्कार करण्याचे कार्य हे स्टार्टअप करत आहे. केवळ मनोरंजन नाही, तर मूल्यांची जोपासना हा यामागचा मुख्य उद्देश आहे.



